
शनिवार, २५ फेब्रुवारी २०२३
◆ वर्ष १५ ◆ अंक २१८
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## छत्रपती संभाजीनगर, धाराशिव नामांतराला केंद्राची मंजुरी



**नवी दिल्ली** : महाराष्ट्रातील औरंगाबादचे नाव छत्रपती संभाजीनगर आणि उस्मानाबादचे नाव धाराशीव देण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाला केंद्र सरकारने शुक्रवारी (दि. २४) मंजुरी दिली. राज्याचे उपमुख्यंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही माहिती दिली. आपल्या ट्वीटमध्ये त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्री अमित शाह यांचे आभार मानले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सरकारने करून दाखविले, असेही उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या ट्वीटमध्ये म्हटले आहे. राज्यात सत्तांतर घडल्यानंतर शिंदे-फडणवीस सरकारने उद्धव ठाकरेंच्या मंत्रिमंडळाने मंजूर केलेल्या प्रस्तावाला स्थगिती देऊन औरंगाबादचे नामकरण छत्रपती संभाजीनगर आणि उस्मानाबादचे धाराशिव करण्याचा नवा प्रस्ताव मंजूर केला होता. या प्रस्तावाला केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे.


### अंतरंग

गुणवत्तापूर्ण पिढी घडवण्यात शिक्षकांचा वाटा -केसरकर/२

रेशनिंग दुकानदाराविरोधात पाचाडमध्ये उपोषण सुरूच/७

रसायनीत ॲथलेटिक्स, व्हॉलीबॉल प्रशिक्षण/८


# उद्धव ठाकरेंच्या अडचणी वाढणार

## कोर्लईतील बंगल्यांची नोंद रद्द केल्याप्रकरणी ग्रामसेवक, सरपंचांवर गुन्हा



**अलिबाग : प्रतिनिधी**

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि वायकर कुटुंबीयांच्या मुरूड तालुक्यातील कोर्लई येथील १९ बंगल्यांच्या घोटाळा प्रकरणात सहा जणांविरोधात रेवंदडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या बंगल्यांची नोंदणी रद्द करून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी कोर्लई ग्रामपंचायतीचे तत्कालीन ग्रामसेवक, सरपंच व सदस्य यांच्याविरुद्ध हा गुन्हा दाखल झाला आहे. त्यामुळे ठाकरेंच्याही अडचणी वाढण्याची शक्यता आहे.

कोर्लई येथील जागेतील १९ बंगल्यांची नोंद रद्द केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करावा, अशी मागणी भाजप नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांनी केली होती. याबाबतची तक्रार मुरूडच्या ग्रामविकास अधिकारी संगीता भांगरे यांनी नोंदविली. त्यानुसार ग्रामसेवक देवंगणा वेटकोळी, विनोद मिंडे, वेदिका म्हात्रे, सरपंच गोविंद चंदर वाघमारे, रेश्मा रमेश मिसाळ, रिमा रमेश पिटकर आणि प्रशांत जानू मिसाळ यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उद्धव ठाकरे यांच्या पत्नी रश्मी ठाकरे आणि आमदार रवींद्र वायकर यांच्या पत्नी मनीषा वायकर यांनी २०१४ साली (कै.) अन्वय नाईक यांच्याकडून कोर्लई येथील जागा त्यावरील बांधकामासह विकत घेतली होती. या जागेवर १९ बंगले असल्याची नोंद ग्रामपंचायत कार्यालयात होती. कै. अन्वय नाईक या घरांची घरपट्टी भरत होते. हे बंगले ठाकरे-वायकर यांच्या नावे करावेत यासाठी पाठपुरावा करण्यात आला. त्यानुसार ही घरे ठाकरे-वायकर यांच्या नावे झाली. त्यांची घरपट्टीही ते भरत होते. नंतर मात्र हे प्रकरण अडचणीचे ठरू शकते लक्षात आल्यावर उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना त्यांनी दबाव टाकून २०२२मध्ये कागदपत्रांमध्ये फेरफार करून बनावट कागदपत्रांच्या आधारे या घरांची नोंदणी रद्द करून घेतली आणि बंगले जमीनदोस्त केले, असा आरोप भाजप नेते किरीट सोमय्या यांनी केला होता.

या प्रकरणी पोलिसांत गुन्हा दाखल करावा, अशी मागणीही किरीट सोमय्या यांनी केली. त्यांचा याबाबत पाठपुरावा सुरू होता. अखेर गुरुवारी (दि. २३) रात्री रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. भा. दं. वि. कलम ४२०, ४६५, ४६६, ४६८ आणि ३४ अन्वये हा गुन्हा दाखल झाला असून या प्रकरणाचा अधिक तपास निरीक्षक देविदास मुपडे करीत आहेत.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींमुळे देशाची प्रतिष्ठा वाढली -विनोद तावडे



(छाया : विजय मांडे)

**कर्जत : प्रतिनिधी**

रक्ताचा एक थेंबही न सांडता कलम ३७० रद्द करण्यात आले. कोणताही अनुचित प्रकार न होता श्री राम मंदिर उभारले जात आहे. दहा वर्षांपूर्वी आपल्या पासपोर्टला परदेशात किंमत नव्हती. अशा अनेक चांगल्या गोष्टी आतापर्यंत झाल्या आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या करिष्म्यामुळे देशाची प्रतिष्ठा वाढलेली आहे. पुढील पंधरा वर्षे भारतीय जनता पक्षाचे सरकार केंद्रात असेल. या निवडणुकीत दोन तृतीयांश बहुमत कसे मिळेल यासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागले पाहिजे, असे प्रतिपादन भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी येथे केले.

भाजप नेते विनोद तावडे हे कौटुंबिक सोहळ्यासाठी दोन दिवसांच्या कर्जत मुक्कामी आले होते. त्यांना कर्जतमधील कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करावे, अशी विनंती पक्षाच्या किसान मोर्चाचे प्रदेश सचिव सुनील गोगटे यांनी केली होती. त्यानुसार तावडे यांनी कर्जत शहरातील भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयाला गुरुवारी (दि. २३) भेट दिली. तालुका अध्यक्ष मंगेश म्हसकर, सुनील गोगटे, ज्येष्ठ महिला पदाधिकारी कल्पना दास्ताने, भाजप तालुका सरचिटणीस संजय कराळे, शहर अध्यक्ष बळवंत घुमरे, युवा कार्यकर्ते किरण ठाकरे, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष प्रमोद पाटील, महिला तालुका अध्यक्ष स्नेहा गोगटे, उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, प्रदेश पदाधिकारी ऋषिकेश जोशी, मारुती जगताप, शिरीष कदम, विभाग अध्यक्ष केशव तरे, रमेश कदम आदी उपस्थित होते.

या वेळी तावडे यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधताना कर्जतच्या भाजप विचारांशी एकनिष्ठ असलेल्या कार्यकर्त्यांमध्ये यायला नेहमीच आवडते. मी १९९५ ते २००४ अशी नऊ वर्षे कर्जतला नेहमी येत असे. त्या वेळचे कर्जत आणि आताचे कर्जत यामध्ये खूप फरक बघायला मिळत आहे. कर्जत परिसराचा विकास खूप झपाट्याने झाला आहे. येथे पक्ष अधिक मजबूत करा, असे आवाहन कार्यकर्त्यांना केले.

### काँग्रेसचे अमित चाचड भाजपमध्ये

या वेळी कर्जतचे माजी नगराध्यक्ष आणि काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस धनंजय चाचड यांचे चिरंजीव अमित चाचड तसेच गुंडगे येथील कार्यकर्ते राज सूरज बली यादव आणि रितिका यादव यांनी विनोद तावडे यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. त्यांचे स्वागत करण्यात आले तसेच नेरळचे श्रीकृष्ण डुकरे यांना मंडल उपाध्यक्षपदी नियुक्ती केल्याचे पत्र तावडे यांच्या हस्ते देण्यात आले. त्यानंतर तावडे यांनी गोगटे यांच्या निवसस्थानी जाऊन त्यांच्या वयोवृद्ध मातोश्रींची भेट घेतली.

# शिंदेंच्या बंडानंतर उद्धव ठाकरेंनी सत्तास्थापनेची ऑफर दिली होती

## उपमुख्यमंत्री फडणवीस यांचा गौप्यस्फोट



**मुंबई : प्रतिनिधी**

एकनाथ शिंदे यांनी बंड केल्यानंतर उद्धव ठाकरेंनी फोन करून सत्तास्थापनेसाठी विचारणा केली होती, असा गौप्यस्फोट उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. ते एका वृत्तवाहिनीच्या विशेष कार्यक्रमातील मुलाखतीत बोलत होते.

उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी याच मुलाखतीमध्ये उद्धव ठाकरेंच्या एका विधानाचा संदर्भ देत अडीच वर्षांमध्ये काँग्रेस, राष्ट्रवादीने त्यांना संपवल्याचे सांगितले. ते म्हणायचे ना युतीमध्ये २५ वर्षे सडलो, पण हे बघा ना अडीच वर्षांत संपले. काँग्रेस, राष्ट्रवादीने मिळून त्यांना संपवले. शेवटी आपण म्हणतो ना असंगाशी संग, असे सूचक विधान त्यांनी केले.

राजकारणात जेव्हा तुमच्याशी धोका होतो, तुमच्या पाठीत खंजीर खुपसला जातो तेव्हा जिवंत रहावे लागते. त्या वेळी तुम्हाला राजकारणात रिलेव्हंट रहावे लागते. आमच्या लक्षात आले की उद्धव ठाकरेंनी धोका दिला आहे. तेव्हाच आम्हाला राष्ट्रवादीकडून इशारे मिळत होते. म्हणून त्यांच्याशी चर्चा सुरू केली व अंतिम टप्प्यात नेली, मात्र त्यांनी निर्णय बदलला, असे फडणवीस म्हणाले.

# पुण्यात मुख्यमंत्र्यांची भव्य रॅली



**पुणे : प्रतिनिधी**

पुण्यातील कसबा विधानसभा पोटनिवडणूक प्रचाराच्या शुक्रवारी (दि. २४) शेवटच्या दिवशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मतदारांना साद घातली. भाजप, शिवसेना व मित्रपक्षांच्या युतीचे उमेदवार हेमंत रासने यांच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री शिंदे यांच्या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीस मोठा प्रतिसाद मिळाला.

या वेळी मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, हे सरकार लोकाभिमुख काम करणारे आहे. कसबा मतदारसंघाचे जे प्रश्न आहेत ते सरकार या ठिकाणी विकासाची गंगा आणून मार्गी लावणार आहे. आमच्या सरकारचे प्रतिनिधी म्हणून हेमंत रासने त्याचा पाठपुरावा करतील आणि या जनतेला न्याय देतील. पुढे त्यांनी, काल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची रॅली होती. त्या वेळीही प्रचंड गर्दी होती. मी भाग्यवान आहे एक मुख्यमंत्री म्हणून मलादेखील आशीर्वाद द्यायला एवढ्या मोठ्या संख्येने लोक आले. त्यांना मी मनापासून धन्यवाद देतो, त्यांचे आभार मानतो, असे म्हटले.

## निवडक

### 'राष्ट्रीय सुरक्षेसाठी भारत काहीही करायला तयार'

**नवी दिल्ली** : भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी पाकिस्तानला पुन्हा एकदा सूचक इशारा दिला आहे. त्यांनी अप्रत्यक्षपणे पाकिस्तानचा उल्लेख करत म्हटले की, कोणताही देश आपल्या समस्यांमधून बाहेर पडून समृद्ध होऊ शकत नाही, जर त्याचा मूळ उद्योग दहशतवाद असेल. ते पुढे म्हणाले की, भारत हा अत्यंत सहनशील देश आहे, पण आपल्या सीमांचे रक्षण करण्यासाठी, राष्ट्रीय सुरक्षेसाठी कोणत्याही स्तरावर जाण्यास तयार आहोत.

### व्यायाम करताना पोलिसाचा हृदयविकाराने मृत्यू

**हैदराबाद** : येथील जीममध्ये व्यायाम करताना २४ वर्षीय पोलिसाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. विशाल असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव असून तो असिफ नगर पोलीस ठाण्यात कार्यरत होता. काही जणांनी त्याला हॉस्पिटलमध्ये दाखल केले, मात्र तोपर्यंत त्याचा मृत्यू झाला होता.

# पटोलेंना हटवून मोघेंना प्रदेशाध्यक्ष करा

## विदर्भातील २४ काँग्रेस नेत्यांची मागणी



**नागपूर : प्रतिनिधी**

काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या अडचणीत वाढ होताना दिसत आहे. प्रदेशाध्यक्षपदावरून पटोले यांना हटवा आणि शिवाजीराव मोघेंना अध्यक्ष करा, अशी मागणी विदर्भातील मोघे समर्थक २४ नेत्यांनी पक्षाचे निरीक्षक रमेश चेन्निथला यांच्याकडे केली आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले मनमानी करीत आहेत. ते पक्षाच्या बैठकीत कुणाचेही ऐकत नाही. पक्षात त्यांनी 'नानागिरी' सुरू असल्याचा दावा मोघे यांच्या समर्थकांनी केला आहे.

पटोलेंनी काँग्रेसमध्ये गटबाजी आणली. पक्षातून दलित, मुस्लिम आणि आदिवासी यांना दूर केले. त्यामुळे पटोलेंना प्रदेशाध्यक्ष पदावरून हटवून आदिवासी नेते मोघे यांना प्रदेशाध्यक्षपद करा, अशी मागणी विदर्भातील नेत्यांनी पक्षाचे निरीक्षक रमेश चेन्निथला यांच्याकडे केली आहे. त्यामुळे आता चेन्निथला याबाबत काय भूमिका घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

नाशिक पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीवरून राजकीय वातावरण तापले आहे. या निवडणुकीच्या निमित्ताने काँग्रेसमधील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आल्याचे पाहायला मिळाले. सत्यजीत तांबे यांनी अपक्ष अर्ज भरून एक प्रकारे बंड पुकारले होते. यावरून प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्यात मतभेद असल्याची चर्चा सुरू झाली तसेच थोरात नाराज असल्याचेही दिसून आले होते.

### हायकमांडला भेटणार

काँग्रेस समितीचे सचिव रहमान खान नायडू, प्रदेश सदस्य प्रकाश मुगदीया, सरदार महेंद्रसिंह सलूजा, इक्राम हुसैन यासोबत इतर २१ पदाधिकाऱ्यांनी रमेश चेन्निथला यांची मुंबईत भेट घेतली. नाना पटोले यांना हटवण्याची मागणी करण्यासाठी हे सर्व नेते लवकरच हायकमांडला भेटण्याकरिता रायपूर येथील काँग्रेसच्या अधिवेशनात जाणार आहेत.

## शुभेच्छा..!



**पनवेल : रायगडचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व त्यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर यांच्या लग्नाचा सुवर्ण महोत्सवी अर्थात ५०वा वाढदिवस शुक्रवारी मोठ्या उत्साहात साजरा झाला. त्यानिमित्त त्यांना पदाधिकारी, कार्यकर्ते, हितचिंतकांनी शुभेच्छा दिल्या. संजय भगत यांच्याकडूनही या वेळी शुभेच्छा देण्यात आल्या.** (छाया : विकास म्हात्रे) **अधिक छायाचित्रे पान ३ वर..**

# रायगड प्रीमिअर लीगसाठी उद्या अलिबाग येथे खेळाडूंचा लिलाव




**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड प्रीमियर लीगमध्ये खेळणाऱ्या खेळाडूंची लिलाव (ऑक्शन) प्रक्रिया रविवारी (दि. २६) अलिबाग येथे होणार आहे. एकूण आठ संघांमध्ये ही स्पर्धा होणार असून जिल्ह्यातील सुमारे तीनशे खेळाडूंनी स्पर्धेत ऑनलाईन पद्धतीने फॉर्म भरून आपापला सहभाग नोंदविला आहे.

रायगडातील २५ वर्षांखालील खेळाडूसाठी रायगड प्रीमियर लीग या टी-२० क्रिकेट स्पर्धेचे आयोजन मार्च व एप्रिल महिन्यात करण्यात येणार आहे. रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या मान्यतेने होणारी ही स्पर्धा जिल्ह्यातील खेळांडूसाठी प्रतिष्ठेची स्पर्धा म्हणून मानली जाते. गतवर्षी स्पर्धा दिमाखात झाली होती. या वर्षी आरपीएलचे दुसरे पर्व आहे.

खेळाडूंना ऑक्शन पद्धतीने आठ संघांचे संघ मालक आभासी पॉईंट्स प्रकाराने आपापल्या संघात दाखल करून घेतील. प्रत्येक संघात १५ खेळाडूंचे ऑक्शनद्वारे पथक तयार करण्यात येईल. रायगड जिल्ह्यातील युवा क्रिकेट खेळाडूंच्या कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

अलिबाग येथील बॅ. ए. आर. अंतुले भवनाच्या सभागृहात होणाऱ्या खेळाडूंच्या लिलावावेळी स्थानिक आमदार महेंद्र दळवी, रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या संघाचे माजी कर्णधार अर्जुन पाटील, भगवान शेट्टी, भूषण मोरे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. ऑक्शन व त्यानंतर होणाऱ्या प्रत्यक्ष स्पर्धेची रायगडवासीयांना उत्सुकता लागून राहिली आहे.

### देशाच्या कानाकोपऱ्यात कमळ फुलणार -पंतप्रधान

**शिलाँग : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी शुक्रवारी (दि. २४) मेघालय दौऱ्यावर होते. यानिमित्त भाजपच्या वतीने आयोजित भव्य रॅलीत त्यांनी काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल केला. देशाने नाकारलेले, निराशेच्या गर्तेत बुडालेले काही लोक आजकाल जपमाळ घालतात आणि म्हणत आहेत की, मोदीजी, तुमची कबर खोदली जाईल, पण देश म्हणतोय, देशाच्या कानाकोपऱ्यात मोदी तुमचे कमळ फुलणार, असे ते म्हणाले.

आज भारत यशाच्या नवीन शिखरांना स्पर्श करीत आहे आणि मेघालय यामध्ये भक्कम योगदान देत आहे. ते पुढे घेऊन राज्यासाठी काम करायचे आहे. मला सांगायला आनंद होत आहे की, मेघालय आणि ईशान्येतील लोक कमळ आणि भाजपसोबत आहेत, असेही पंतप्रधान मोदींनी म्हटले.

# उन्हाचा तडाखा आणखी वाढणार

## हवामान विभागाचा इशारा

**मुंबई : प्रतिनिधी**

यंदा फेब्रुवारी महिन्यातच उन्हाचा तडाखा जाणवू लागला आहे. पुढील पाच दिवसांमध्ये उष्णतेचे प्रमाण आणखी वाढणार असल्याचा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे.

हवामान विभागाच्या माहितीनुसार पुढील पाच दिवसांमध्ये उत्तर पश्चिम आणि मध्य-पूर्व भारतामध्ये कमाल तापमानात तीन ते पाच अंशांची वाढ अपेक्षित आहे. पुढील दोन दिवसांमध्ये उत्तर मध्य भारतामध्ये हवामानात फारसे बदल अपेक्षित नाहीत, पण यंदाच्या वर्षी मार्च महिन्यातील पहिल्या १५ दिवसांमध्ये देशातील बहुतांश भागांमध्ये तापमान ४० अंशांवर किंवा त्याहूनही जास्त असू शकते.

दरम्यान, महाराष्ट्रामध्ये विदर्भ आणि कोकणात तापमान वाढले असून पुणे आणि नजीकच्या परिसरातही काहीशी अशीच परिस्थिती आहे. हवामान विभागाच्या वतीने कृष्णानंद होसाळीकर यांनी ट्वीट करीत पुणे परिसरात तापमानाची नेमकी काय स्थिती आहे याची माहिती दिली. त्यानुसार कोरेगाव पार्क भागात गुरुवारी तापमान ३८.४ अंशांवर गेले होते. अकोला, चंद्रपूरातही परिस्थिती काहीशी अशीच पाहायला मिळत आहे.

हवामान खात्याने तापमानात झालेल्या या असमान्य बदलासाठी अनेक गोष्टींना कारणीभूत ठरविले आहे. ज्यामध्ये पश्चिमी झंझावात सक्रिय न असणे हे मुख्य कारण सांगण्यात येत आहे. जे काही पश्चिमी झंझावात आतापर्यंत सक्रिय होते ते जास्त तीव्रतेचे नसल्यामुळे हवामानावर त्याचा फारसा परिणाम झाला नाही आणि हिवाळ्याने देशातून काढता पाय घेतला. १९६९नंतर असे तिसऱ्यांदा होत आहे, जेव्हा फेब्रुवारीतच इतका उन्हाळा जाणवतोय, असे हवामान खात्याने नमूद केले आहे.



### आरोग्य सांभाळा, काळजी घ्या!

सातत्याने बदलणाऱ्या हवामानाचे परिणाम नागरिकांच्या आरोग्यावरही होताना दिसत आहेत. ज्यामुळे लहान मुलांसोबतच ज्येष्ठ नागरिकांमध्येही सर्दी, खोकला, ताप अशा समस्या जाणवू लागल्या आहेत. त्यामुळे वेळीच काळजी घेण्याचे आवाहन आरोग्य यंत्रणांमार्फत करण्यात येत आहे. सध्याचे तापमान पाहता थंड खाणे टाळा, गर्दीच्या ठिकाणी जाऊ नका, उन्हात बाहेर पडताना टोपी अथवा स्कार्फने डोके झाका, असे सल्ले नागरिकांना देण्यात येत आहेत.

# गुणवत्तापूर्ण पिढी घडवण्यात शिक्षकांचा वाटा

## शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांचे प्रतिपादन



**मुंबई : प्रतिनिधी**

विविध क्षेत्रांतील गुणवत्तेत राज्य देशात अग्रस्थानी असून यात शिक्षकांचा मोलाचा वाटा आहे. भारतातील याच गुणवत्तेच्या आधारे आपला देश भविष्यात जगाचे नेतृत्व करेल, असा विश्वास शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी व्यक्त केला.

शालेय शिक्षण विभागाच्यावतीने दिल्या जाणाऱ्या सन २०२१–२२ च्या क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कारांचे वितरण कौशल्य विकास मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी दूरदृश्य प्रणालीद्वारे विजेत्या शिक्षकांचे अभिनंदन करताना मंत्री श्री. केसरकर बोलत होते.

शिक्षणमंत्री श्री. केसरकर म्हणाले, विद्यार्थ्यांचे जीवन घडविण्यात शिक्षकांचे मोठे योगदान असते. शासनाने नुकताच ६१ हजार शिक्षकांच्या अनुदानाचा प्रश्न सोडविला असून, त्यांच्या सर्व समस्या सोडविण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. शिक्षण क्षेत्रात यापुढेही अग्रेसर राहण्यासाठी तसेच अधिकाधिक रोजगार निर्माण होण्याच्या उद्देशाने व्यावसायिक शिक्षणावर तसेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरावर भर देण्यात येत आहे. पुरस्कार प्राप्त शिक्षकांनी यात भरीव योगदान द्यावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. कौशल्य विकास विभागामार्फत रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात असल्याबद्दल कौतुक करून शालेय शिक्षण विभागामार्फत देखील टीसीएस, टीआयएसएस, अमेझॉन आदींसोबत करार करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल यांनी कार्यमान प्रतवारी निर्देशांकात महाराष्ट्र अव्वल असून यात शिक्षकांचा मोलाचा वाटा असल्याचे सांगितले. गुणवत्ता पुरस्कारप्राप्त शिक्षकांनी इतरांना प्रेरणा मिळेल असे कार्य करून आदर्श महाराष्ट्र घडविण्यासाठी योगदान द्यावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, यासाठी पायाभूत सुविधांसह विविध सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत, यांचा ज्ञानदानासाठी योग्य वापर करावा, अशी सूचनाही त्यांनी केली.

समाजाची निःस्वार्थ भावनेने आणि निष्ठेने सेवा करणाऱ्या व शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या शिक्षकांना त्यांच्या अंगीकृत कामात प्रोत्साहन देण्याच्या व त्यांच्या गुणांचा यथोचित सन्मान करण्याच्या उद्देशाने राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात येतात. २०२१–२२ यावर्षीच्या १०८ पुरस्कार विजेत्या शिक्षकांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र यासह पुरस्काराची रक्कम दहा हजार रूपये तसेच राष्ट्रीय / राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षकांना दिले जाणारे एक लाख रूपये असे एकत्रित एक लाख दहा हजार रूपये पुरस्कार स्वरूपात प्रदान करण्यात आले.

यावेळी शालेय शिक्षण आयुक्त कार्यालयाने तयार केलेल्या दिशादर्शिकेच्या 'मंथली टेबल प्लॅनर'चे अनावरण करण्यात आले. प्रारंभी शिक्षण आयुक्त यांच्या प्रस्तावनेचे वाचन कौस्तुभ दिवेगावकर यांनी केले. तर संचालक कृष्णकुमार पाटील यांनी आभार मानले.

आमदार कपिल पाटील, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रनजीतसिंह देओल, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक कौस्तुभ दिवेगावकर, माध्यमिक शिक्षण संचालक कृष्णकुमार पाटील, संचालक (योजना) महेश पालकर, मुंबई विभागीय शिक्षण उपसंचालक संदीप संगवे यांच्यासह पुरस्कार विजेते शिक्षक आणि त्यांचे कुटुंबिय यावेळी उपस्थित होते.

### ग्रामपंचायत स्तरावर आदर्श महिलांचा सन्मान करणार!

**कौशल्य विकास मंत्री श्री. लोढा म्हणाले, शिक्षकांकडे उच्च गुणवत्ता असून ते निस्वार्थ भावनेने नवीन पिढी घडविण्याचे काम करीत असतात. अशा आदर्श शिक्षकांचा सन्मान करणे, हा शासनाचा बहुमान असल्याचे त्यांनी सांगितले. राज्याच्या महिला धोरणांतर्गत सावित्रीबाई फुले यांच्या जन्मदिनी प्रत्येक ग्रामपंचायतस्तरावर दोन आदर्श महिलांचा सन्मान करण्यात येणार असून त्यातील किमान एक महिला शिक्षक असेल. प्रत्येक विद्यार्थ्याकडे जातीने लक्ष पुरविणारी भारतातील गुरूकुल शिक्षण पद्धती जगभरात अव्वल होती, याचा उल्लेख करून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जाहीर केलेल्या नवीन शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून राज्यात अधिक गुणवान पिढी तयार होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.**

# राज्यात वीर सावरकर पर्यटन सर्किट सुरू करणार -ना. लोढा



**मुंबई : प्रतिनिधी**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे विचार,जीवनकार्य जागतिक स्तरावर पोहोचवण्यासाठी देशातील पहिले 'वीर सावरकर पर्यटन सर्कीट' राज्यात सुरु करण्यात येणार आहे. तसेच, नाशिक येथील भगूर या स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जन्मस्थानी भव्य सावरकर थीम पार्क आणि संग्रहालयदेखील उभारण्यात येणार आहे. २६ फेब्रुवारी रोजी स्वा.सावरकर आत्मार्पण दिनानिमित्त भगूर येथे भव्य अभिवादन पदयात्रा व कार्यक्रमात सावरकर भक्त नागरिक, कार्यकर्ते, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याची माहिती पर्यटन मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी मंत्रालय विधीमंडळ वार्ताहर कक्षात आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

भगूरमधील 'सावरकर वाडा' येथे पर्यटन विभागामार्फत आयोजित मुख्य कार्यक्रमात पर्यटन, कौशल्य विकास व उद्योजकता, महिला व बालविकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्यासह नाशिकचे खासदार हेमंत गोडसे, आमदार सरोज अहिरे यांच्यासह विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक संस्था-संघटनांचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते, विद्यार्थी उपस्थित राहणार आहेत. 'स्वा. सावरकर आत्मार्पण दिनानिमित्त दि. २६ फेब्रुवारी रोजी सकाळी ८.०० वाजता भगूरमधील नूतन विद्यालय ते सावरकर वाडा अशी भव्य अभिवादन पदयात्रा काढण्यात येणार आहे. सकाळी ९.०० ते १०.३० दरम्यान सावरकर वाडा येथील मुख्य कार्यक्रमात गायक चारुदत्त दीक्षित व सहकलाकारांचे स्वा. सावरकर लिखित गीतांचे गायन, योगेश सोमण लिखित-दिग्दर्शित अभिवाचन, मान्यवरांचे सत्कार आदी कार्यक्रम होणार आहेत.

# होळीनिमित्त कोकणवासीयांसाठी उरण येथून बसची मागणी



**उरण : वार्ताहर**

होळी सणानिमित्त रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यात सालाबाद प्रमाणे कोकणवासी प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून ज्यादा गाड्या सोडण्यासंदर्भातील निवेदन कोकण वासीय उत्कर्ष संस्था, उरण या संस्थेचे कार्याध्यक्ष नंदकुमार साळवी आणि कार्यकारिणी सदस्य संतोष पवार यांनी एसटीच्या महामंडळाचे आगार प्रमुख श्री. वारघडे यांना दिले. हे निवेदन आगार प्रमुख श्री. वारघडे यांनी संबंधित विभागातील रामनाथ म्हात्रे मोबाईल नंबर ९३२६३९५५२९ यांना ॲडव्हान्स बूकींग करण्यासंदर्भात सूचना दिल्या आहेत.

सालाबादप्रमाणे होळी सणा निमित्त कोकणात जाण्यासाठी जसे रत्नागिरी (रातराणी), माणगाव-महाड-पोलादपूर-खेड ), दाभोळ-दापोली, देवरुख, कणकवली या ठिकाणी राहणाऱ्या कोकणवासीयांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन कोकणवासीय उत्कर्ष संस्थेच्यावतीने करण्यात आले आहे.

# पाताळगंगा एमआयडीसी रस्त्याच्या दुभाजकावर लावलेली झाडे सुकली

**खोपोली : प्रतिनिधी**

पाताळगंगा औद्योगिक वसाहतीत रस्त्यामध्ये दुभाजकावर लावण्यात आलेली झाडे पाण्याअभावी सुकली असून पाणी घालण्याची जबाबदारी असलेला ठेकेदार देखील पर्यावरणाच्या बाबतीत कोरडा असल्याचे दिसून येत आहे. तालुक्यातील सर्वात मोठी औद्योगिक वसाहत म्हणून पाताळगंगा औद्योगिक वसाहत ओळखली जाते.



रासायनिक, औषध उत्पादन तसेच लुब्रिकंट्स उत्पादन घेणारे लहान मोठे जवळपास ४० पेक्षा अधिक कारखाने औद्योगिक वसाहतीत आहे. या ठिकाणी कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वसाहतीच्यामधील दुभाजकांवर विविध झाडांची लागवड करण्यात आली आहे. झाडांची निगा राखण्यासाठी ठेकेदाराची नेमणूक असून सिद्धेश्वरी कॉर्नर ते बॉम्बे डाईंग कारखानापर्यंत झाडांची जबाबदारी ठेकेदारावर देण्यात आली आहे. सध्या उन्हाचा वाढलेला तडाख्यात झाड पाण्याअभावी झाड सुकली आहेत. झाडांना सध्या नियमित पाण्याची आवश्यकता असून ठेकेदार मात्र दुर्लक्ष करीत आहे. निसर्गाचा समतोल राखण्यासोबत परिसराची शोभा वाढवणारी झाड निस्तेज झाल्यामुळे पर्यावरण प्रेमी नाराज झाले आहे. आणखी काही दिवस या झाडाला पाणी न मिळाल्यास दुभाजकांवर झाडांचा अस्तित्व शिल्लक राहणार नाही त्यामुळे ठेकेदाराने सुकत चाललेल्या झाडांकडे लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे. शासनाच्या संबंधित विभागाने कागदी घोडे नाचविण्यापेक्षा या समस्यांकडे लक्ष घालावे अशी पर्यावरण प्रेमींकडून जोरदार मागणी समोर येत आहे.

**सिद्धेश्वरी कॉर्नर ते बॉम्बे डाईंग कारखान्यापर्यंत झाडांना पाणी घालण्या साठी ठेकेदार नेमणूक आहे पर्यावरण प्रेमीच्या तक्रारीची दखल घेऊन ठेकेदाराला नियमित झाडांना पाणी घालण्यासाठी सूचना देण्यात येतील.**

**-एस दरेकर, अधिकारी मराऔवि महामंडळ पाताळगंगा**

# नवी मुंबईत होणार पुनर्विकास मार्गदर्शन शिबिर

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई शहरात सिडको निर्मित इमारती धोकादायक झाल्याने त्यांच्या पुनर्विकास परिषद पर्याय समोर येत आहे. पुनर्विकास हा जरी काळाची गरज परंतु त्याची कायदेशीर माहिती असणे हे देखील तितकेच महत्वाचे आहे.त्यामुळे यावर घर धारकांना.योग्य माहिती असण्याहेतू सिवुड मध्ये पुनर्विकास परिषदचे आयोजन करण्यात येणार आहे.

शहरातील सिडको इमारतीं धोकादायक झाल्याने त्या पुनर्विकासाच्या जात्यात आहेत. तर खाजगी इमारतीही आज पुनर्विकासाच्या सुपात आहेत. उद्या त्याही पुनर्विकासाच्या जात्यात येणार आहेत. म्हणूनच पुनर्विकास ही काळाची गरज असली तरी या पुनर्विकासाच्या बाबतीत नियम, नियमावली कायदेशीर व प्रशासकीय अटी शर्ती विषयी माहिती असणे हे पुनर्विकास प्रकल्पातील प्रत्येक गृहनिर्माण संस्था पदाधिकाऱ्यांना व सदनिका धारकांना आवश्यक आहे.

भविष्यात सोसायटीचे काम सुरू होऊन बंद पडू नये म्हणून विभागातील गृहनिर्माण संस्था पदाधिकाऱ्यांना व नागरिकांना पुनर्विकास विषयी अटी, शर्ती, नियम, नियमावली व प्रशासकीय बाबतीत माहिती मिळण्याकरिता आमदार मंदाताई म्हात्रे यांच्या उपस्थितीमध्ये पुनर्विकास क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन घेण्याकरिता पुढील आठवड्यात सिवुड मध्ये पुनर्विकास परिषदेचे आयोजन केले जाणार आहे. अशी माहिती माजी नगरसेवक भरत जाधव यांनी दिली आहे.

# विविध मागण्यांसाठी कर्मचाऱ्यांचे कोकण भवनसमोर आंदोलन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग शासन नियम व नियमानुसार कार्यवाही करीत नसल्याने सर्व सेवानिवृत्त स्थापत्य अभियांत्रिकी माजी कर्मचाऱ्यांनी अर्धनग्न मूक उपोषण तर महिला कर्मचारी व मृत्यू पावलेल्यांच्या विधवा पत्नी केवळ मूक उपोषण करित जाहीर निषेध कोकण भवन येथे करण्यात आला.



या निषेध आंदोलनामध्ये महाराष्ट्र नागरी सेवा नुसार सर्व तेरा संवर्ग कर्मचाऱ्यांचे पदनामांतर करून समक्षक स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदावर समाविष्ट करणे व नियम ४० नुसार वेतन निश्चित करणे.

तसेच कालबध्द पदोन्नती अंतर्गत पहिला लाभ पदोन्नती साखळीतील वरिष्ठ श्रेणीचा लाभ वित्त विभाग शासन शुध्दीपत्रक ०१/०२/२०२० नुसार अनुज्ञेय करावा. तर ०१/०३/२००६ रोजी अश्वासित प्रगती अंतर्गत वरिष्ठ वेतन श्रेणीचा दुसरा लाभ अनुज्ञेय करावा. वित्त विभाग शुध्दीपत्रक क्रमांक वेतन- १११० / प्र.क्र ८/२०१०/सेवा-३ नुसार ०१/१०/२००६ ते ३१/०३/२०१० या कालावधीत देण्यात आलेल्या काल्पनीक वेतन वाढींचा फरक रोखीने आदा करावा. अशा मागण्या करण्यात आली दरम्यान, बांधकाम अधीक्षक अभियंता सुषमा गायकवाड यांना निवेदन सादर केले यावेळी त्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत ज्या मागण्या आहेत त्या शासनापर्यंत पोहचवून न्याय देण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

# हाणामारी खटला : राजा केणी यांच्यासह २९ जणांची मुक्तता

**अलिबाग : प्रतिनिधी**

मागील विधानसभा निवडणुकीच्या मतदानानंतर झालेल्या हाणामारीच्या प्रकरणी शिवसेनेचे विद्यमान जिल्हाप्रमुख राजा केणी यांच्यासह २९ जणांची न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली.

२०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणूकीदरम्यान मतदानाच्या दिवशी हा प्रकार घडला होता. अलिबाग तालुक्यातील कुसुंबळे गावात दिवसभर मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. मतदान यंत्रे रवाना झाल्यानंतर कुसुंबळे नाक्यावर शिवसेना व शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते आपसात भिडले. दोन गटात तुंबळ हाणामारी झाली. याप्रकरणी पोयनाड पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहिता कलम ३२६, ३२३, ३२४, ३२७, १४३, १४७, १४९ नुसार गुन्हा दाखल झाला होता. या खटल्याची सुनावणी अलिबागच्या न्यायालयात सुरू होती.

या खटल्यात एकूण शिवसेना जिल्हाप्रमुख राजा केणी यांच्यासह २९ आरोपी होते. या खटल्याची सुनावणी पूर्ण होवून २३ फेब्रुवारी रोजी जिल्हा न्यायालयाने दिलेल्या निकालात राजा केणी यांच्यासह २९ आरोपींची निर्दोष मुक्तता केली. आरोपींतर्फे ॲड. अंकित बंगेरा यांनी काम पाहिले. तीन वर्षांनी लागलेल्या निकालानंतर राजा केणी आणि त्यांचया समर्थकांनी आनंद व्यक्त केला.

# तुर्भे गाव येथे महोत्सवाची धूम



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

श्री विठाई प्रबोधन सामाजिक सेवा संस्थेच्या वतीने नवी मुंबई भाजप जिल्हाध्यक्ष डॉ. रामचंद्र घरत, विजया घरत यांच्या मार्गदर्शनाखाली तुर्भे महोत्सवाचा शुभारंभ झाला.

तुर्भे गाव येथील संत श्री रामतनू माता मैदान येथे हा महोत्सव २८ फेब्रुवारीपर्यंत सुरू असून यामध्ये हळदी-कुंकू, महाराष्ट्राची लोकधारा, नवी मुंबईचा नाखवा, हॉलिवूड ते कोळीवूड, डान्स स्पर्धा, दर्यासागर कोळी असे सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. ज्येष्ठ नागरिक आणि १० वी व १२मध्ये उत्तम गुणांनी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार होणार असल्याचे निमंत्रक डॉ. रामचंद्र घरत यांनी सांगितले.

महोत्सवाचे उद्घाटन आमदार मंदा म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी महापौर जयवंत सुतार, माजी सरपंच डी. डी. घरत, बेटी बचाओ बेटी पढाओ महाराष्ट्र संयोजक डॉ. शुभा फरांदे-पाध्ये, निर्मला सुतार, भाजप युवा मोर्चाध्यक्ष दत्ता घगाळे, महिलाध्यक्षा दुर्गा ढोक, युवा अध्यक्षा सुहासिनी नायडू आदी उपस्थित होते. या वेळी प्रतिभावंत ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला.

# दिघोडे शाळेचे स्नेहसंमेलन रंगले; गुणवंतांचा गौरव

**उरण : वार्ताहर**

रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दिघोडे येथे वार्षिक स्नेहसंमेलन व गुणवंत विद्यार्थ्यांचा बक्षिस समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला.

श्री गणेशाची आराधना करून सरस्वती मातेला वंदन करून शिवजयंती दिवशी छत्रपती शिवाजी महाराजांना मानाचा मुजरा करून आयोजित कार्यक्रमास सुरवात करण्यात आली. प्राविण्य मिळवलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांचे त्यांच्या आई वडिलांन सोबत त्यांचे गुणगौरव वार्षिक स्नेहसंमेलन मध्ये करण्यात आले. त्यामुळे प्रत्येक आई वडिलांना आपल्या गुणवंत मुला- मुलीचा शाळेकडून असा गुणगौरव करण्यात आल्याने त्यांचे मन भरून आले. त्याचप्रमाणे गावातील विविध क्षेत्रातील विविध सत्कारमूर्तीचे सत्कार ठेवण्यात आले होते.



विद्यार्थ्यांनी रंगमंचावर विविध कलागुण सादर करून उपस्थित रसिकांची मने जिंकली या स्नेहसंमेलनाच्या प्रसंगी शाळेच्या विनंतीला मान देऊन अनेक मान्यवरांनी उपस्थिती राहून शाळेच्या विद्यार्थ्यांचे कौतुक करून कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष निलेश पाटील यांनी भूषविले.

तसेच या कार्यक्रमास दिघोडे ग्रामपंचायत सरपंच सोनिया घरत, उपसरपंच पूजा पाटील, ग्रामपंचायत सदस्या कविता म्हात्रे, लोचन पाटील, तृप्ती पाटील, दिनेश नांदगावकर, मच्छिंद्र कोळी, सुहास गोवारी, कीर्तीनिधी ठाकूर,शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्षा प्रियांशा शेट्ये, ग्रामसेविका मत्स्यगंधा पाटील, प्रशासक अनिल नारंगीकर, मान्यवर मनिषा गिजे,ज्ञानदिप म्हात्रे,योगिता पाटील, शंकर कारतुकर उपस्थित सत्कारमूर्ती क्रिकेटर विश्वजित ठाकुर, इतिहास संशोधक अभिषेक ठाकूर, शिक्षणप्रेमी लक्ष्मण पाटील,

विस्तार अधिकारी नामदेव कोळी, शाळा व्यवस्थापन समिती माजी अध्यक्ष मालती पाटील, शिक्षण प्रेमी सचिन कोळी, शिक्षण प्रेमी रमण कासकर,धावपटू श्रेया पाटील, एमआयडीसी एरिया मॅनेजर वर्षकेतू ठाकूर, शिक्षणप्रेमी गिरिष ठाकूर, शिक्षणप्रेमी अभिजित पाटील, माजी उपसरपंच कैलास म्हात्रे, युट्यूब लॉगर समिता कोळी, माजी अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती शरयू ठाकूर, तसेच शिक्षक वर्ग उपशिक्षक नवनीत माळी,उपशिक्षिका सविता वारंग, गीता नवाळे, संगणक शिक्षिका अपेक्षा कासकर तसेच अंगणवाडीच्या मंदा कोळी,प्रभावती ठाकूर, लता कोळी त्याचप्रमाणे पत्रकार सुनिल ठाकूर, नंदकुमार तांडेल उपस्थित होते. सूत्रसंचालन मुख्याध्यापक जितेंद्र ठाकूर यांनी केले.

# गुटखा घेऊन येणाऱ्या ट्रकवर कारवाई

## पोलिसांनी जप्त केला एक कोटींचा मुद्देमाल

**पनवेल : वार्ताहर**

गुजरातहून नवी मुंबईत अवैधरित्या गुटखा आणून विकणाऱ्या टोळीवर तुर्भे पोलीस ठाणेकडील गुन्हे प्रकटीकरण पथकाने कारवाई करीत एक कोटींचा मुद्देमाल जप्त केला आहे.

नवी मुंबई येथील महापे चेकपोस्ट येथे तुर्भे पोलिसांना नाकाबंदी दरम्यान चेकिंग करीत असताना एका टेम्पोमध्ये गुटख्याच्या ३० मोठ्या गोणी व टेम्पो जप्त केला होता. या अनुषंगाने तपास करीत असताना वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र दौंडकर, पोलीस निरीक्षक गुन्हे संजय जोशी, सपोनि. प्रभाकर शिऊरकर, हवालदार जितेंद्र पवार, पालीस नाईक सोमनाथ भालेराव, संतोष पालवे, आनंद सोनकांबळे, शिपाई राजेश आघाव, मनोहर जाधव, राजेश उगाडे, सुनील सकट आदींच्या पथकाला गुटखा हा डोंबिवली परिसरात राहणारे आरोपी गुजरात येथून मागवून त्याची ठाणे, नवी मुंबई, मुंबई व रायगड परिसरात विक्री करीत असल्याची माहिती मिळाली. त्या अनुषंगाने तुर्भे पोलीस ठाणेकडील गुन्हे प्रकटीकरण पथकाने डोंबिवली परिसरातील पलावा सिटी व पिंपळेश्वर मंदिराजवळून आयशर कंटेनर व टेम्पो गुटख्यासह ताब्यात घेतला.



याप्रकरणी पोलिसांनी दोन्ही चालक व डोंबिवली मानपाडा येथून गुटखा विक्री करणारा असे तीन जणांना अटक केली आहे. या कारवाईत पोलिसांनी एकूण ९९ लाख ७८ हजार २६४ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

# रिचार्जचे कापलेले पैसे परत मिळवताना अडीच लाखांना फटका

**पनवेल : वार्ताहर**

मोबाईल रिचार्जची बँक खात्यातून कट झालेली ३९९ रुपयांची रक्कम परत मिळविण्याच्या नादात एका सुरक्षारक्षकाने दोन लाख ६५ हजार रुपये गमावल्याची घटना तळोजामध्ये उघडकीस आली आहे. तळोजा पोलिसांनी या प्रकरणातील सुरक्षारक्षकाला गंडा घालणाऱ्या सायबर चोरट्याविरोधात फसवणुकीसह आयटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे.

तक्रारदार देवेंद्रदेव सिंग हा तरुण तळोजा येथील देवीचा पाडा येथे राहण्यास असून तो तोंडरे मच्छी कंपनीमध्ये सुरक्षारक्षक म्हणून कामाला आहे. तो आपल्या कामावर असताना, त्याच्या सिमकार्डचे ऑटो रिचार्ज झाल्याचे तसेच त्याच्या खात्यातून ३९९ रुपये वजा झाल्याचा त्याला मेसेज आला. त्यामुळे त्याने गुगलवरून कंपनीचा कस्टमर केअर नंबर मिळवून त्यावर संपर्क साधला. त्यानंतर त्याने समोरील व्यक्तीला त्याच्या मोबाईलच्या रिचार्जचे ३९९ रुपये आपोआप कट झाल्याचे सांगून पैसे परत मिळवण्यासाठी काय करावे लागेल, अशी विचारणा केली.

या वेळी चोरट्याने त्याला एक लिंक पाठवून ती इन्स्टॉल करण्यास सांगितले. त्यानुसार केले असता देवेंद्रदेवच्या खात्यातून काही सेकंदात एक लाख ६५ हजार रुपये वजा झाले. त्यानंतर सायबर चोरट्याने त्याला दुसऱ्या बँकेच्या खात्याची माहिती टाकण्यास भाग पाडून त्यात ओटीपी टाकण्यास सांगितले. त्यानंतर देवेंद्रदेवच्या दुसऱ्या बँक खात्यातूनही एक लाख रुपये वजा झाले.

अशा पद्धतीने चोरट्याने त्याच्या दोन्ही बँक खात्यातून दोन लाख ६५ हजार रुपये परस्पर काढून घेतल्याचे लक्षात आल्यानंतर देवेंद्रदेवने दोन्ही बँक खाते बंद करून तळोजा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# पोलिसांच्या प्रसंगावधानामुळे दुचाकी चोरीचा प्रयत्न फसला

**पनवेल : वार्ताहर**

पोलिसांच्या सतर्कतेमुळे मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवेवर दुचाकी चोरीचा प्रयत्न फसला आहे. पोलिसांनी ई-चलनद्वारे मूळ मालकाशी संपर्क साधून दुचाकी ताब्यात घेतली आहे.



मुंबई-पुणे एक्सप्रेस महामार्गावर पळस्पे वाहतूक केंद्राचे पोलीस उपनिरीक्षक गणेश बुरकुल, उपनिरीक्षक केसरकर, पळस्पे मोबाईल केंद्राचे अंमलदार भगत, परदेशी, महाजन या आपल्या पथकासह नेहमीप्रमाणे पेट्रोलिंग करीत असताना आरोपी साहिल यादव (वय १८) हा होंडा ॲक्टिवा दुचाकी चालवत घेऊन जात असताना आढळून आला. द्रुतगती महामार्गावर दुचाकीला परवानगी नसल्याने त्याला गाडी थांबवण्याचा इशारा केला, मात्र तो न थांबता पळू लागल्याने त्याचा पाठलाग करून देवद गाव येथे त्याला थांबवण्यात आले. त्याचे लायसन्स व गाडीच्या कागदपत्रांची तपासणी केली असता तो समर्पक माहिती न देता उडवाउडची उत्तरे देऊ लागला. त्यामुळे याबाबत संशय आल्याने पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन ई-चलन डिव्हाईसच्या सहाय्याने गाडीच्या मूळ मालकाचा संपर्क क्रमांक शोधून त्यांच्याशी संपर्क साधला असता सदर गाडीचे मालक महेंद्र गोसावी (रा. मुंबई) यांनी ही दुचाकी चोरीला गेल्याचे सांगितले, तसेच त्याबाबत भोईवाडा पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल केल्याचे सांगितले.

त्यानुसार पोलिसांनी आरोपी साहिल यादव व चोरीस गेलेली दुचाकी ताब्यात घेऊन पोलीस उपनिरीक्षक सूर्यकांत म्हेत्रे व पथकाच्या ताब्यात दिले.

## श्री महागणपती सेंद्रिय गटाला पुरस्कार

**उरण : वार्ताहर**

चिरनेर येथील श्री महागणपती सेंद्रिय गटाला कृषी विभागाच्या वतीने देण्यात येणारा उत्कृष्ट सेंद्रिय गटाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा रायगड यांच्या विद्यमाने खांदेश्वर येथील सिडको मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या जिल्हा कृषी महोत्सवात कृषी अधीक्षक उज्ज्वला बाणखेले यांच्या हस्ते श्री महागणपती सेंद्रिय गटाचे अध्यक्ष प्रफुल्ल खारपाटील, सदस्य अनिल केणी, दामोदर मुंबईकर व रवींद्र ठाकूर या सर्वांनी हा पुरस्कार स्वीकारून, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. कमी खर्चात अधिक उत्पादन देणारी सेंद्रिय शेती असून सामुहिक यांत्रिकीकरण, कडधान्य लागवड आणि विविध कृषी योजना या गटाच्या माध्यमातून राबविल्या जात आहेत.

# चिरनेर येथे कृषी उद्योजकता विकास कार्यक्रम

**उरण : वार्ताहर**

शेतकऱ्यांच्या शेतमालाला गुणवत्तापूर्ण बनविणे, शेतमालाचे व्यवस्थापन व प्रक्रिया मूल्यसंवर्धन, कृषी मालाची थेट विक्री इत्यादींच्या माध्यमातून, शेतकऱ्यांचे निव्वळ उत्पन्न वाढविणे आणि कृषी क्षेत्रात उद्योजकता वाढविण्यासाठी कृषी उद्योजकता विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहे. याविषयी कृषी विभागामार्फत माहिती देण्यासाठी बुधवारी (दि. २२) चिरनेर येथे ग्रामपंचायत कार्यालयात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



टोरेंजिअस कंपनीचे प्रकल्प समन्वयक रवींद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या सभेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी त्यांनी सांगितले की, महाराष्ट्र शासन कृषी विभागाकडून कंपनी स्थापन करण्यासाठी पूर्णपणे कृषी विभाग टोरेंजिअस कंपनीच्या माध्यमातून मदत करणार असल्याचे सांगून भविष्यात शेतकऱ्यांनी स्थापन केलेल्या कंपनीसाठी कृषी प्रक्रिया प्रकल्पासाठी ६० टक्के अनुदान हे कृषी विभागाकडून देण्यात येणार असल्याचे त्यांनी या वेळी स्पष्ट केले.

प्रकल्प व लाभार्थी निवड प्रक्रियांतर्गत शेतकरी उत्पादक गट किंवा कंपनी असणे आवश्यक असल्याचे सांगून, त्यासाठी एफपीओची स्थापना करणे आवश्यक आहे. त्याची कार्यपद्धती आणि त्यासाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे याची माहिती देण्यात आली. यात २५१ ते ५५०पर्यंत शेतकऱ्यांचे गट स्थापन करण्याची मुभा देण्यात आली आहे. यासाठी दहा जणांची संचालक पदावर निवड करण्यात येणार आहे.

राज्यस्तरीय निवड समितीच्या मान्यतेनंतर प्रकल्पाची अंमलबजावणी, प्रकल्प संचालक (आत्मा) करतील. यात तंत्रज्ञान व्यवस्थापन मत्स्य आणि कडधान्यविषयक प्रकल्प राबविले जातील. पीक उत्पादकता वाढ, उत्पादित मालाची गुणवत्ता वाढवून, निव्वळ नफ्यात वाढ आणि बाजार संपर्क तसेच पर्यायी बाजार व्यवस्था याद्वारे कृषी व्यावसायिकेतेवर आधारित उद्योगजकता विकास करण्यासाठी हा घटक राबविण्यात येत असल्याचे पाटील यांनी सांगितले.

तालुका कृषी अधिकारी किसन शिगवण यांनी कृषी विभागाच्या विविध योजना, विमा योजना तसेच विविध अवजारे घेण्याविषयीचे मार्गदर्शन केले, तर पर्यवेक्षक शिवाजी लोहकरे यांनी शेतकरी बांधवांनी प्रगतीचा मार्ग धरून उत्पन्न वाढीस प्रयत्न केले पाहिजे. त्याचबरोबर कृषी सहाय्यक निखिल देशमुख यांनी कंपनी स्थापन झाल्यास, कृषी उत्पादनास चालना मिळेल, असे त्यांनी स्पष्ट केले. कृषी मित्र प्रफुल्ल खारपाटील यांनी शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्या व अडचणी मांडल्या.



# रामशेठ ठाकूर महाविद्यालयाची औद्योगिक क्षेत्रभेट

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य शास्त्र महाविद्यालयात शुक्रवारी (दि. २४) एक दिवसीय औद्योगिक क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यात आले होते.

महाविद्यालयातील सर्व शाखेतील सुमारे ७३ विद्यार्थी व विद्यार्थिनींनी फोर्ट येथील बॉम्बे स्टॉक एक्सचेंजला भेट देऊन स्टॉक मार्केट विषयी माहिती घेतली. या एकदिवसीय औद्योगिक क्षेत्र भेटीमध्ये डॉ. व्ही. आदित्य श्रीनिवास मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच मुख्य अर्थतज्ज्ञांनी विद्यार्थी व विद्यार्थिनींना स्टॉक मार्केटचे प्रात्यक्षिक घटक याविषयी माहिती दिली व मोलाचे मार्गदर्शन केले. प्रस्तुत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रुपेंद्र गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना क्षेत्रभेटीमध्ये सहभागी झाल्याबद्दल सर्वांचे कौतुक केले व शुभेच्छा दिल्या. या एक दिवसीय औद्योगिक क्षेत्रभेटीचे आयोजन प्रा. राहुल कांबळे विभाग प्रमुख (वाणिज्य विभाग) यांनी केले व तसेच प्रा. डॉ. शुभांगी वास्के, प्रा. योगिता पाटील, प्रा. नम्रता पारीक यांनी सहकार्य केले.

# वातावरणातील बदलामुळे लहान मुलांना आजारांनी ग्रासले

**उरण : प्रतिनिधी**

तालुक्यातील वाढत्या प्रदूषणामुळे आणि वातावरणातील बदलामुळे सध्या लहान मुलांना ताप, सर्दी, खोकला, दमासारख्या आजारांनी ग्रासले आहे. त्यामुळे सध्या खासगीसह शासकीय रुग्णालयामध्ये गर्दी झाल्याचे पहायला मिळत आहे.

सध्या दिवसा उष्णतेचे प्रमाण वाढत असून रात्री हवेत गारवा निर्माण होत असल्याने अशा वातावरणातील बदलामुळे सध्या लहान मुलांना ताप, सर्दी, खोकला, दमा सारख्या आजारांची लक्षणे दिसू लागली आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्र कोप्रोली येथील रुग्णालयात दिवसात १० ते १५ लहान रुग्ण हे तपासणी करून घेण्यासाठी येत आहेत, अशी माहिती प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉ. साहिल मोकल यांनी दिली आहे.

लहान मुलांच्या आरोग्याची तपासणी व औषध उपलब्ध करण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र कोप्रोली येथील डॉक्टर तसेच गावपातळीवरील उपकेंद्रातील परिचारिका, वैद्यकीय कर्मचारी हे अंगणवाडी सेविकांच्या माध्यमातून मोहीम राबवित आहेत. पालकांनी घाबरून न जाता लहान मुलांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी तसेच त्या रुग्णांवर उपचार करून घेण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र कोप्रोली येथील डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असे आवाहन प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. सुनील प्रधान यांनी केले आहे.



पनवेल : रतनशेठ भगत यांच्या शेलघर येथील नवीन घराच्या वास्तूशांती व श्री सत्यनारायण पुजेनिमित्त भाजपचे तालुकाध्यक्ष अरूणशेठ भगत, युवा नेते विश्वजीत पाटील, अनिल कोकाटे आदींनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या.



पनवेल : रायगडचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व त्यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर यांच्या लग्नाचा ५०वा वाढदिवस शुक्रवारी मोठ्या उत्साहात साजरा झाला. त्यानिमित्त त्यांना गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, कोळी समाज अध्यक्ष विश्वनाथ कोळी, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी नगरसेवक सतीश पाटील, किशोर पाटील, युवा नेते साईचरण म्हात्रे, रयत शिक्षण संस्थेचे बाळासाहेब कारंडे, आर. पी. ठाकूर, गुजर यांच्यासह अन्य मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.

## संपादकीय

# बदलते हवामान व परिणाम

गेल्या काही दिवसांपासून हवामानात पुन्हा बदल जाणवू लागला आहे. एकीकडे सकाळी व रात्री वातावरणात गारवा असताना दुसरीकडे दिवसा मात्र उन्हाचे चटके बसू लागले आहेत. वातावरणात अचानक होणाऱ्या या बदलाचे परिणाम शेतीवर तर होतच असतात, शिवाय मानवी आरोग्याच्या तक्रारीदेखील सातत्याने बदलणाऱ्या हवामानामुळे वरचेवर वाढीस लागल्या आहेत.

**गेल्या वर्षी जोरदार पाऊस पडला. अनेक वर्षांचे विक्रम वरुणराजाने मोडित काढले. काही ठिकाणी पूर येऊन जीवित व वित्तहानीचीही नोंद झाली. त्यामुळे साहजिकच थंडीही जास्त पडेल असा अंदाज होता. त्यानुसार थंडीचा जोर जाणवला, मात्र अधूनमधून ती गायब झाली. पूर्वी ऋतूनुसार हवामान असायचे. पावसाळा म्हटला की पाऊस, हिवाळ्यात थंडी आणि ऊन्हाळा म्हणजे उष्णतेच्या झळा असे समीकरण ठरलेले असे. हल्ली मात्र ऋतूचक्र बदलले असून वर्षाच्या बाराही महिने कुठे ना कुठे पावसाच्या सरी पडत असतात. खासकरून पावसाळा हा जून ते सप्टेंबर या नेहमीच्या चार महिन्यांच्या कालमानात न राहता जुलै ते ऑक्टोबर असा असतो. एवढेच नव्हे तर तो नोव्हेंबरपर्यंत लांबतो आणि नंतरदेखील कधीही पडतो. यंदा थंडीतही चढ-उतार दिसून आले. कधी कडाक्याचा गारवा जाणवला, तर मध्येच गारवा सरून उकाडा होत होता. सद्यस्थितीत तर सकाळी व रात्री वातावरण थंड असते. दुपारी मात्र उन्हाच्या झळा लागतात. त्यामुळे दुपारच्या सुमारास फिरणे अवघड होऊ लागले आहे. या बदलत्या हवामानामुळे संसर्गजन्य आजारांची लागण नागरिकांना होऊ लागली आहे. ताप, थंडी, सर्दी, कोरडा खोकला यांसारख्या आजारांनी लोक त्रस्त आहेत. विविध शासकीय व खासगी रुग्णालयांत अनेक रुग्ण दाखल झाले आहेत. ऊन व थंडीमुळे नागरिक बेजार झाले असून काहींना अशक्तपणा जाणवत आहे, तर काहींच्या शरीरातील पांढऱ्या पेशींचे प्रमाण कमी होत असल्याचे चित्र आहे. यात वाढ होण्याची भीती व्यक्त केली जात आहे, कारण येत्या काळात उष्णतेचे प्रमाण वाढणार आहे. ज्या प्रमाणे थंडीच्या लाटा आल्या त्या प्रमाणे आता उष्णतेच्या लाटांचा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. या वाढत्या तापमानाचे प्रमुख कारण म्हणजे प्रदूषण व कार्बन उत्सर्जन. हल्ली सर्रास कंपन्यांतील विविध वायू हे प्रक्रिया न करता हवेत सोडले जातात तसेच वाहनांची संख्याही दिवसेंदिवस वाढत चालल्याने प्रदूषण सर्वत्र पसरते. परिणामी विविध विकारांना मानवाला सामोरे जावे लागत आहे. या सर्वाला कारणीभूतही बऱ्याच प्रमाण मानवच आहे. हल्ली कुठेही, कशाचाही निर्बंध राहिलेला नाही. सिमेंट काँक्रीटची जंगले भारभर विस्तारत चालली आहेत. त्यासाठी वृक्षतोड, उत्खनन सुरू आहे. डोंगर सपाटीकरणाचाही अक्षरशः सपाटा लावण्यात आला आहे. जोडीला मानवनिर्मित वणवे आहेतच. एवढी सारी छेडछाड निसर्गाशी केल्यावर मग दुसरे काय होणार. निसर्ग आपला प्रकोप दाखवित आहे. मग पूर, त्सुनामी, दुष्काळ, ग्लोबल वॉर्मिंग, भूकंप अशी एक ना अनेक संकटे येत आहेत. अजूनही वेळ गेलेली नाही. वेळीच साऱ्याला आवर घालून ठोस उपाययोजना करणे काळाची गरज आहे. तेव्हाच आपण जे सुख अनुभवले ते आपण आपल्या पुढील पिढ्यांना देऊ शकतो. अन्यथा बदलत्या हवामानात विविध नैसर्गिक आपत्तींमध्ये होणारा विध्वंस कुणालाही रोखता येणार नाही एवढे मात्र नक्की!**

# भरड धान्य : निरोगी आरोग्याची गुरूकिल्ली

देशातील सर्वाधिक उत्पादन असलेले, सर्वाधिक जमिनीवर उगवणारे आणि सर्वाधिक लोकांचे अन्न असलेले भरड धान्य हे यावर्षाचे 'आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्ष' साजरे केले जाणार आहे.

पूर्वीच्या काळी उखळ आणि मुसळ वापरून या धान्यावरील साल किंवा कवच भरडून काढले जात असे. त्यानंतर गरजेनुसार जात्यावर दळून पीठ तयार केले जात असे. यामुळे या धान्याला 'भरड धान्य' असे म्हणतात. या धान्याला विशेष प्रकारची शुद्धता किंवा कोणतीही विशेष प्रक्रिया करण्याची गरजच नसते. भरड धान्य हे 'श्रीअन्न' म्हणूनही आळखले जाते. ज्वारी आणि बाजरी ही साधारणतः आकाराने मोठी असलेली धान्ये असून त्यांना 'ग्रेटर मिलेट' म्हणतात, तर आकाराने बारीक असलेली नाचणी, वरी, राळा, कोदो, बर्टी, प्रोसो व ब्राऊनटौप ही सर्व 'मायनर मिलेट' किंवा 'बारीक धान्ये' म्हणून ओळखली जातात. तर राजगिरा आणि बकव्हीट (कुट्टू) यांना 'स्यूडो मिलेट्स' असे म्हणतात.

ज्वारी, बाजरी, नागली या भरड धान्यांमध्ये गहू आणि तांदूळ यापेक्षा कित्येक पटीने अधिक खनिज, कॅल्शियम, प्रथिने असल्याचे राष्ट्रीय पोषण संस्थेच्या आतापर्यंतच्या अनेक अभ्यासांमधून सिद्ध झाले आहे. अनेक महिलांमध्ये ॲनिमिक अर्थात रक्तातील लालपेशींची कमतरता असल्याने त्या अशक्त होतात. फक्त महिलांचे आणि बालकांचे आरोग्यच नव्हे, तर सध्याच्या ढेपाळलेल्या शेतीव्यवस्थेवरही भरड धान्य हा सकस पर्याय आहे. हवामानातील बदल, पाण्याची ओढ, कोरडवाहू शेती, बियाणांचा आणि खतांचा गगनाला भिडणारा खर्च या साऱ्यावर ज्वारी, बाजरी, नागली ही पिके नामी उपाय आहेत.

भरड धान्य पिकांची वैशिष्ट्ये म्हणजे ही अल्प पावसाच्या परिस्थितीत शुष्क आणि अर्ध-शुष्क भागात वाढतात. यापासून लर्जीचा धोका नाही. या पिकांमध्ये रासायनिक खते आणि कीटकनाशके यांचा वापर अल्प प्रमाणात होतो. या पिकांमध्ये उच्च पौष्टिक मूल्ये असून ती 'पौष्टिक तृणधान्य' म्हणून ओळखली जातात आणि पचायला हलकी असतात. यामुळे जमिनीतील नत्राचे प्रमाण वाढून जमिनीचा पोत सुधारतो. यापासून विविध पदार्थ तयार करून विकल्याने बचत





गट स्वयंपूर्ण होऊ शकतात. बाजरीमध्ये फॉस्फरस उच्च प्रमाणात असून, ते पेशींमधील ऊर्जा आणि अन्य खनिज पदार्थ साठवण्यास साहाय्य करतात. लोहाचेही प्रमाण अधिक असल्यामुळे शरीरातील हिमोग्लोबीन वाढते. नाचणीमध्ये नैसर्गिक कॅल्शियम सर्वाधिक असल्यामुळे प्रतिदिन सेवनामुळे हाडांचे आरोग्य चांगले रहाते. कोकणातील डोंगर, पठारावर पिकवण्यात येणारी नाचणी आता शेतात दिसू लागली आहे. सकस आहारामध्ये नाचणीचा समावेश करण्यात आला आहे. राळ हे पाचक असून त्यात लोह आणि खनिज पदार्थ भरपूर आहेत. वरईमध्ये उच्च लोह धातू आहे. कोडो/कोद्रा मज्जासंस्था मजबूत करण्यासाठी उत्कृष्ट आहे.

नगदी पिकांच्या एकल शेती पद्धतीमुळे रासायनिक खतांचा भडिमार झाल्याने जमिनीचा घसरलेला पोत, भसाभस पाण्याच्या उपशामुळे खाली गेलेली भूगर्भातील पाण्याची पातळी, लाखो रुपयांच्या पीककर्जाने पिकवलेल्या सोन्याच्या मालाला बाजारातील अनियमिततेमुळे मिळणारा मातीमोल भाव, यावर उतारा ठरणाऱ्या मिश्र शेतीत भरड धान्य संजीवनी ठरत आहेत. पावसामुळे मेटाकुटीस आलेल्या शेतकऱ्यांसाठी ज्वारी, बाजरी, नचणी हेच पर्याय दिसत आहेत. कोकणातील डोंगरउतारावरचा आदिवासी शेतकरी असो, वा सिंचनाअभावी होरपळणारा मराठवाड्यातील कोरडवाहू शेतकरी असो, भरड धान्य पिके हाच सर्वांपुढचा अत्यंत महत्त्वाचा पर्याय आहे.

भरड धान्य काही दशकांपूर्वी आपल्याकडील आहाराचा मुख्य भाग होतो, परंतु पॉलीश्ड धान्यांमुळे ती रोजच्या आहारातून दिसेनाशी झाली, परंतु अस्सल भरणपोषण करणारी ही भरड धान्य आजही तितकीच महत्त्वाची आहेत. त्यामुळे आता या भरड धान्यांना महत्त्व मिळावं आणि जागतिक पातळीवर त्यांचा वापर वाढावा म्हणून भारताने पुढाकार घेतला आहे. आपल्या देशाने इतर काही देशांच्या मदतीने भरडधान्यांना संरक्षण मिळावे, त्यांचे लागवडीचे क्षेत्र वाढवून लोकांच्या आहारात त्यांचा समावेश व्हावा. त्याचे महत्त्व सर्व राष्ट्रांना समजावे यासाठी आंतरराष्ट्रीय भरडधान्य वर्ष हा ठराव संयुक्त राष्ट्र संघात मांडला.


युनायटेड नेशन्स म्हणजे संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सदस्य असलेल्या ७० देशांनी या ठरावाला अनुमोदन दिले आणि महत्त्वाचे म्हणजे सर्व १९३ सदस्य राष्ट्रांनी भारताच्या या प्रयत्नाचे कौतुक करत हा ठराव बहुमताने मंजूर केला. आपल्या देशाच्या या प्रयत्नांमुळेच ३ मार्च २०२१ रोजी संयुक्त राष्ट्राच्या महासभेत २०२३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्ष म्हणून साजरे करण्याचे ठरले आणि सर्व सदस्य राष्ट्रांनी त्या दिशेने प्रयत्न करण्यास सुरुवात केली आहे.

२०२३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय भरडधान्य वर्ष म्हणून यशस्वी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने कंबर कसली आहे. महाराष्ट्रात ज्वारी आणि नाचणी या प्रमुख भरड धान्यांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जाते. देशातील भरड धान्य उत्पादनात राज्याचा सिंहाचा वाटा असावा यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत. त्यासाठी भरडधान्य उत्पादन क्षेत्र वाढविण्यात येणार असून, राज्यात पिकणाऱ्या भरड धान्यांपासून उत्पादित खाद्यपदार्थांची महिला बचत गटांच्या माध्यमातून विक्री व्हावी, एकात्मिक बालविकास प्रकल्पांतर्गत देण्यात येणाऱ्या पोषण आहारातदेखील भरड धान्यापासून तयार केलेल्या पौष्टिक खाद्य पदार्थांचा समावेश करण्यासाठी नवनवीन संकल्पना तयार करण्यात येत आहेत. भरड धान्यांपासून खाद्यपदार्थ तयार करण्याचे महिला बचत गटांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या खाद्यपदार्थांचे स्टॉल मंत्रालयाच्या प्रांगणात आणि प्रत्येक जिल्ह्यात आणि शासकीय कार्यक्रमात मांडण्यात आला. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने फेब्रूवारी २०२३चा लोकराज्य अंक हा भरड धान्य विशेषांक म्हणून प्रसिद्ध केला आहे.

शासनाने भरडधान्यांच्या उत्पादनात वाढ करण्यासाठी विविध उपाययोजना आणि उपक्रम राबविण्यास सुरुवात केली आहे. मंत्रालय स्तरावर कृषि, पणन, उमेदसारख्या विभागांच्या बैठका घेऊन नियोजन बध्द आराखडा तयार करण्यात येत आहे. ग्रामविकास विभागाने तयार केलेल्या आतंरराष्ट्रीय भरड धान्य वर्ष २०२३ या माहिती पुस्तिकेचा प्रकाशन सोहळा नुकताच मंत्रालयात पार पडला. कृषि विभागाने याच विषयावर आधारीत एक पोस्टर मुख्यमंत्री यांच्या हस्ते रत्नागिरी येथे प्रकाशित केले. या वेळी महाराष्ट्र भरड धान्य आणि त्याची आरोग्यदायी उत्पादने ग्रामीण महिला बचतगट कसे बनवितात या विषयी मार्गदर्शन करण्यात आले. या बैठकीत राज्याचे मुख्य सचिव मनु कुमार श्रीवास्तव यांनी भरड धान्यांची पौष्टिकता आणि कृषीमधील त्यांचे पारंपरिक महत्त्व लक्षात घेता राज्यातील भरड धान्य उत्पादनवाढीसाठी प्रोत्साहन देण्यात येईल, तसेच या उपक्रमात विविध विभागांनी सर्वोतोपरी सहभाग घ्यावा, अशा सूचनाही दिल्या आहेत.

कोरडवाहू शेतकऱ्यांपासून आदिवासींच्या कुपोषणापर्यंत, दुष्काळापासून अनारोग्याच्या संकटापर्यंत अनेक प्रश्नांचे उत्तर ठरलेल्या ज्वारी, बाजरी, नाचणी सारख्या भरड धान्यांचे उत्पादन वाढले तर राज्यातील आणि देशातील अन्न धान्या विषयीच्या, कुपोषणाच्या विविध समस्या समुळ नष्ट होतील. भरड धान्य वापराचे प्रमाण वाढवून आपणही यात सहभागी होऊया.

**-प्रवीण डोंगरदिवे,**
**उपसंपादक, विभागीय माहिती कार्यालय,**
**कोकण विभाग, नवी मुंबई**



## बदलते तंत्रज्ञान

# नको असलेले कॉल 'असे' करा ब्लॉक

प्रत्येकाच्या हातात आपल्याला स्मार्टफोन पाहायला मिळतो. बहुतांश लोक ड्युअल सिमकार्ड असलेला स्मार्टफोन वापरतात. त्यामुळे स्पॅम कॉलचा त्रास सर्वाधिक




होतो. वैतागून अनेक जण हे नंबर ब्लॉक करतात. असे केले तरी दुसऱ्या नंबरवरून कॉल येण्यास सुरुवात होते. या कॉल्स आणि एसएमएसमुळे अनेक जण फिशिंगचेही बळी ठरले आहेत. काही लोक सापळ्यात अडकतात आणि बँक तपशील शेअर करतात. यामुळे त्यांचे बँक खाते काही मिनिटांतच रिकामे होते.

तुम्हीही अशाच अडचणींना सामोरे जात असाल तर, टेन्शन घेण्याची गरज नाही. कोणता कॉल स्पॅम आहे हे पाहण्यासाठी अँड्रॉईडमध्ये आणि आयओएस डिव्हाइसमध्ये पर्याय उपलब्ध आहे, तसेच त्यांना ब्लॉक करण्याची परवानगीदेखील आहे. गुगलचे फोन ॲप आजकाल बहुतेक अँड्रॉईड स्मार्टफोन्सवर डीफॉल्ट कॉलिंग ॲप म्हणून येते. नको असलेले कॉल कसे ब्लॉक करावे? या ॲप्सच्या माध्यमातून स्पॅम कॉल ब्लॉक करा.

Truecaller : हे ॲप सर्वाधिक वापरले जाते. हे ॲप अनोळखी कॉल ओळखण्यात मदत करते. फसवणूक कॉल आणि स्पॅम कॉल शोधते आणि आधीच सूचना देते. या ॲपद्वारे तुम्ही कोणताही नंबर ब्लॉकलिस्ट आणि ब्लॉक करू शकता.

Should I answer? : हे ॲपदेखील एक उत्तम पर्याय आहे. या ॲपमध्ये स्पॅम नंबर्सचा मोठा डेटाबेस आहे, जो सतत अपडेट केला जातो. जर कोणी कॉल करण्याचा प्रयत्न केला तर ते त्यांना आपोआप ब्लॉक करेल. या ॲपद्वारे आंतरराष्ट्रीय कॉल्सही ब्लॉक केले जाऊ शकतात.

Calls Blacklist : हे देखील एक उत्तम ॲप आहे. ॲप कॉल आणि एसएमएस संदेश दोन्हीसाठी कॉल ब्लॉकर आहे.


Call Blocker : या ॲपद्वारे कॉल सेंटर, स्पॅम नंबर, रोबोकॉल, टेलीमार्केटिंग इत्यादींवरील अनोळखी कॉल ब्लॉक करण्याचे उत्तम काम करते.

**आयफोनवर कॉल कसे ब्लॉक करावे?**

आयफोनवर कॉल ब्लॉक करणे खूप सोपे आहे. यासाठी तुम्हाला सेटिंग ॲपवर जावे लागेल. नंतर फोन ऑप्शन मध्ये जा. आता तुम्हाला सायलेन्स अननोन कॉलर चालू करावा लागेल. तुम्ही Truecaller वर जाऊन कॉल ब्लॉकिंग आणि आयडेंटिफिकेशन चालू करू शकता.

# बॉलीवूडचा चॉकलेट बॉय शाहिद कपूर

शाहीद कपूर हा एक हिंदी चित्रपट अभिनेता असून त्याचा जन्म २५ फेब्रुवारी १९८१ रोजी झाला. तो एक शिकलेला नर्तक असून ज्येष्ठ अभिनेते पंकज कपूर यांचा मुलगा आहे. त्याने त्याची कारकीर्द एका म्युझिक अल्बमने सुरू केली. कपूरने बॉलीवूडमध्ये पहिल्यांदा सुभाष घाईच्या ताल (१९९९) चित्रपटात पार्श्वनर्तक म्हणून नृत्य केला होता. चार वर्षांनंतर त्याला त्याचा पहिला चित्रपट इश्क विश्क (२००३)मध्ये अभिनय करण्याची संधी मिळाली. त्याला या चित्रपटासाठी फिल्मफेअर अवॉर्ड फॉर बेस्ट मेल म्हणून जिंकला होता.



जेव्हा शाहिद तीन वर्षांचा होता तेव्हा त्याच्या आई-वडिलांनी घटस्फोट घेतला; त्याचे वडील मुंबईत शिफ्ट झाले आणि त्यांनी अभिनेत्री सुप्रिया पाठकशी लग्न केले. शाहिद आपल्या आई आणि आजी आजोबांसमवेत दिल्लीतच राहिले. त्याचे आजी-आजोबा स्पुटनिक या रशियन मासिकाचे पत्रकार होते आणि शाहिद हा आजोबांचा लाडका होता. शहीदचे शिक्षण मिठीबाई कॉलेज मुंबई येथे झाले आहे, तसेच त्यांनी तिथे पदवीपर्यंत शिक्षण पूर्ण केले. बालपणापासूनच त्याला अभिनयाचे आकर्षण होते. सुरुवातीच्या काळात शाहिदने जाहिरातींमध्येही काम केले आहे. २००४ मध्ये फिदाच्या चित्रीकरणादरम्यान, त्याने करीना कपूरला डेट करण्यास सुरुवात केली आणि दोघांनीही या नात्याबद्दल जाहीरपणे सांगितले. २००७मध्ये जब

**निमित्त**

वी मेटच्या चित्रीकरणादरम्यान हे जोडपे विभक्त झाले. त्यानंतर, शाहिदने त्याचे वैयक्तिक आयुष्य मिडियाच्या नजरेपासून दूर ठेवण्याचे ठरविले. आपल्या वडिलांच्या नावाचा फायदा शाहिदला कधीच झाला नाही. पंकज कपूर यांचा मुलगा असल्यानं शाहिदला कदाचित चांगले चित्रपट ऑडिशन न देताही मिळू शकले असते, पण असं करण्यास शाहिदचाच नकार होता. त्याने आपल्या वडिलांचं नाव कुठेच वापरले नाही. तो स्वतःची लढाई स्वतः लढला आणि जिंकलासुद्धा. स्वतःच्या कौशल्यावर विश्वास ठेऊन शाहिद आज यशस्वी अभिनेता म्हणून सर्वांसमोर आहे.

त्याने जाहिरातींमध्ये काम करणे तसेच बॅकग्राउंड डान्सर म्हणून काम करणे सुरू ठेवले आणि अखेर २००३ मध्ये त्याला त्याच्या कष्टांचं फळ मिळाले. त्याला पहिला चित्रपट 'इश्क-विश्क' मिळाला. या चित्रपटाने शाहिदचे आयुष्य बदलले. त्याचा हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर हिट झाला आणि त्याला या चित्रपटासाठी फिल्मफेअरचा सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार मिळाला. त्यानंतर त्याने अभिनेत्री अमृता रावसोबत 'विवाह' चित्रपटात काम केलं आणि अभिनेता म्हणून बॉलिवूडमध्ये आपली जागा पक्की केली.

शाहिद कपूर यांनी मीरा राजपूत यांच्यासोबत २०१५ मध्ये लग्न केले. त्यावेळी त्या फक्त २१ वर्षांच्या होत्या. मीरा दिल्ली विद्यापीठातून पदवीधर झालेले आहेत. या जोडप्याला दोन मुले आहेत. त्यामध्ये एक मुलगी मिश्या आणि दुसरा मुलगा झेन आहे.

शाहिद कपूर यांनी आपल्या कारकीर्दीत बरेच हिंदी चित्रपट दिले आहेत. त्यापैकी इश्क विश्क २००३, दिल मागे मोर, दिवाने हुये पागल, वाह लाईफ हो तो ऐसी, चायनाटाउन, चुपके चुपके, विवाह, फुल अँड फायनल, जब वी मेट, किस्मत कनेक्शन, कमीने, चार्ली, दिल बोले हडिप्पा, बॉम्बे टॉकीज, फटा पोस्टर निकला हिरो, पंजाबी मस्त, उडता पंजाब, पद्मावत राजा, वेलकम टू न्यूयॉर्क, कबीर सिंग आदी.

शहिद कपूरला आतापर्यंत २००४मध्ये इश्क विश्क फिल्मप्लेयर सर्वोत्तम अभिनेता पुरस्कार, २०१५ हैदर फिल्मफेअर सर्वोत्तम अभिनेता पुरस्कार व २०१७ उडता पंजाब फिल्मफेअर सर्वोत्तम अभिनेता समीक्षक पुरस्कार मिळाले आहेत.

**-साभार मराठी मोल, वीकिपीडिया**

**क्लिक...क्लिक...!**



**मुरुड : संयम व शांतता बाळगणारा पक्षी म्हणजे बगळा. पाण्यात उभा राहून आपले भक्ष्य टिपण्यात अत्यंत हुशार गणला गेलेला हा पक्षी असून एकदरा खाडीत असंख्य बगळे मासे टिपण्यासाठी जमा झालेले दिसून येतात.** (छाया : संजय करडे)

## आरोग्य प्रहर



# 'या' पदार्थांनी दूर होईल व्हिटॅमिन डीची कमतरता

निरोगी राहण्यासाठी शरीरात आवश्यक जीवनसत्त्वे असणे अत्यंत आवश्यक आहे, त्यापैकी एक जीवनसत्व 'डी' आहे. व्हिटॅमिन डी हाडांच्या वाढीस चालना देण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. ते रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास आणि शरीरातील जळजळ कमी करण्यास मदत करतात. व्हिटॅमिन डी असलेल्या पदार्थांचा आहारात समावेश करावा.

**अंडी** : व्हिटॅमिन डी फूड म्हणून तुम्ही आहारात अंड्याचाही समावेश करू शकता. एनसीबीआयच्या रिपोर्टनुसार, कॅल्शियम आणि प्रोटीनसोबतच अंड्यामध्ये व्हिटॅमिन डीही भरपूर असते. पोषक तत्वांची कमतरता पूर्ण होऊ शकते.

**मासे** : ओमेगा ३ फॅटी ॲसिड माशांमध्ये आढळते. याशिवाय हे व्हिटॅमिन डी चा चांगला स्रोत आहे. व्हिटॅमिन डीची कमतरता पूर्ण करण्यासाठी सॅल्मन फिश खा. १०० ग्रॅम सॅल्मन फिशमध्ये सुमारे २४५ आययू व्हिटॅमिन डी३ असते. याशिवाय व्हिटॅमिन डीची कमतरता मॅकेरल आणि हेरिंग माशांनीदेखील पूर्ण केली जाऊ शकते.

**संत्री** : संत्र्याला व्हिटॅमिन सीचा स्रोत मानला जातो, पण, त्यात व्हिटॅमिन डीही चांगल्या प्रमाणात आढळते. संत्र्याच्या रसाचे सेवन करून व्हिटॅमिन डीची कमतरता दूर करता येते.

**मशरूम** : मशरूममध्ये व्हिटॅमिन डीदेखील चांगल्या प्रमाणात आढळते. रोज मशरूम खाल्ल्याने शरीरात आवश्यक असलेली व्हिटॅमिन डी ची कमतरता पूर्ण होते.

**दूध** : मुबलक प्रमाणात कॅल्शियमसह दुधात व्हिटॅमिन डीचे प्रमाण चांगले असते. व्हिटॅमिन डीची कमतरता पूर्ण करण्यासाठी दररोज सकाळी एक ग्लास दूध प्या.

**सोया फूड** : व्हिटॅमिन डीची कमतरता भरून काढण्यासाठी टोफू, सोया मिल्क आणि सोया दही यांसारख्या सोया फूडचा वापर करणेदेखील फायदेशीर ठरू शकते.

**दही** : जर तुम्ही रोज दही खात असाल तर त्यात भरपूर प्रमाणात व्हिटॅमिन डी देखील असते, ज्यामुळे शरीरात व्हिटॅमिन डीचा पुरवठा होतो. यासाठी ताजे दही खावे.

# तुपगाव-चौक येथील गटाराचे काम मार्गी

## दोन्ही सरपंच एकमेकांच्या सहकार्याने करताहेत सामाजिक कार्य

**चौक : रामप्रहर वृत्त**

ग्रुप ग्रामपंचायत तुपगाव व ग्रुप ग्रामपंचायत चौक हद्दीवरील गटाराचे काम रायगड जिल्हा भाजप उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे व सरपंच रविन्द्र कुंभार यांच्या प्रयत्नाने होणार आहे.त्यामुळे हा परिसर दुर्गंध मुक्त होईल.



चौक-लोहोप मार्गावरील चौक -तुपगाव हद्दीवरील असणाऱ्या इमारतींचे सांडपाणी रस्त्यावर येत आहे. येथे गटाराचे नियोजन नसल्याने व ईमारत बांधकाम करताना योग्य नियोजना अभावी हे सांडपाणी रस्त्यावर व एका डबक्यात साठल्याने मोठी दुर्गंधी येत आहे, त्यातुनच डास आणि मच्छर होत असल्याने रोगराई पसरते आहे. याच ठिकाणी सुमारे ५० वर्षापासून डॉक्टर वाळिंबे यांचा दवाखाना असून,नेताजी पालकर भात गिरणी आहे,तर येथूनच विस्तारित गावठाण कडे जाणारा मार्ग आहे.ईमारती ग्रुप ग्रामपंचायत चौक हद्दीत असून सांड पाण्याचा होणारा निचरा तुपगाव हद्दीत होत आहे.या हद्दीच्या वादात येथील काम रखडल्याचे खात्रीपूर्वक समजते.तर ईमारत मालकाचा कोणताच अधिकृत परवाना नाही.

महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ यांची परवानगी नसून सार्वजणिक बांधकाम खात्याच्या दुर्लक्षाने अशी अवस्था निर्माण झाली आहे. याचा त्रास परिसरात राहणाऱ्या लोकांना व या मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना होत आहे.याबाबत डॉ.वाळिंबे व सिद्धी भात गिरणीचे संचालक नारायण पाटील यांनी रीतसर तक्रार दाखल केली होती. आज सकाळी जेसीबी च्या साहाय्याने माती व दुर्गंध पाण्याने भरलेले गटार उपसण्याचे काम सुरू केले आहे.सद्या तात्पुरत्या स्वरूपात हे काम सुरु असून पुन्हा त्यावर काही होऊ नये म्हणुन त्वरित कायमस्वरुपी उपाययोजना करण्यात येणार असल्याचे सरपंच रितु ठोंबरे यांनी सांगितले. याची दखल घेत भाजप जिल्हा उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे यांनी तुपगावचे सरपंच रविन्द्र कुंभार यांच्या समवेत पाहणी केली. ग्रामस्थांच्या सूचना व प्रत्यक्ष पाहणीत वस्तुस्थिती कळल्यावर चौक सरपंच ठोंबरे व तुपगाव सरपंच कुंभार यांनी हे काम पूर्ण करण्याचे आश्वासन दिले असून लवकरच हे काम सुरू होईल.

# कर्जतमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात सीसीटीव्ही कॅमेरे लावावेत

## आरपीआय आठवले गटाची मागणी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरातील सरकारी दवाखाना जवळ असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारक परिसरातील परिस्थितीची माहिती असायला हवी यासाठी कर्जत पोलीस दलाने तेथे सीसीटिव्ही कॅमेरे लावावेत, अशी मागणी आरपीआय आठवले गटाचे विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष किशोर गायकवाड यांनी लेखी निवेदन देवून केली आहे.



कर्जत येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा असलेल्या चौकात पालिका किंवा पोलीस दलाकडून त्या भागातील हालचाली यांच्यावर लक्ष ठेवण्यासाठी सीसीटिव्ही कॅमेरे नाहीत. भविष्यात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी तेथे सीसीटिव्ही कॅमेरे यांचे जाळे असावे अशी मागणी आरपीआय यांच्याकडून करण्यात आली आहे. तशा आशयाचे निवेदन पक्षाच्या आठवले गटाचे विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष किशोर गायकवाड यांनी पोलिसांकडे दिले आहे. कर्जत पोलीस ठाण्यात पोलीस उपनिरीक्षक उदय सुर्वे यांनी निवेदन स्वीकारले आहे. यावेळी आरपीआयचे उदय जाधव, अशोक गायकवाड, विजय जाधव, संतोष जाधव आदी उपस्थित होते.

कर्जत शहरात मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ सुरु असते. त्यामुळे अवजड वाहने या मार्गावरुन ये-जा करत असतात. सीसीटीव्ही कॅमेरे लावल्यामुळे या वाहनांवर लक्ष ठेवणेही सोपे जाणार आहे.

# इंदापूरजवळ ओढ्यात रस्सीमध्ये अडकलेल्या मगरीला जीवदान

**पाली : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावर माणगाव तालुक्यातील इंदापूर गावाजवळील नगरोली येथील अजय मोरे त्यांच्या फार्महाऊसच्या शेजारी असलेल्या ओढ्यात एक तब्बल आठ फुटी मगर नायलॉनच्या रस्सीमध्ये गुरुवारी (ता.२३) अडकली होती. या मगरीला वन्यजीव संरक्षक टीमने वन विभागाच्या मदतीने शिताफीने पकडून रात्री सुरक्षित अधिवासात सोडून दिले.



ओढ्यात एक मगर रस्सीमध्ये अडकलेली दिसल्यावर अजय मोरे यांनी ताबडतोब कोलाड येथील वन्यजीव संरक्षक सागर दहिंबेकर यांना संपर्क साधला. सागर लगेच त्यांच्या टीमला घेऊन घटनास्थळी पोहोचले. मगरीला रेस्क्यू करण्याआधी सागर यांनी स्थानिक वन विभाग कार्यालयाला संपर्क केला. इंदापूर वनविभागाचे अधिकारी घटनास्थळी पोहोचले. प्राथमिक माहितीनुसार मगरीचा आकार हे पाच ते सहा फूट सांगण्यात आला होता. परंतु जागेवर गेल्यानंतर निदर्शनात आले की मगरीचा आकार आठ फुट आहे. सागर यांनी लगेचच रेस्क्यू ऑपरेशन सुरू केले. त्या आधी व्युव्हरचना केली व सर्वांनी मगरीला शिताफीने पकडले. आणि नायलॉनच्या रस्सीमध्ये अडकलेल्या मगरीची सुटका केली. या रेस्क्यूला जवळपास अर्धा तासाचा कालावधी लागला. वन विभागाच्या मदतीने मगरीला नैसर्गिक अधिवासात सुखरूप सोडण्यात आले.

> **पावसाळ्यात काळ नदीला पाणी आल्यावर मोठ्या मगर बाहेर पडतात. आजूबाजूच्या ओढे व नाल्यांकडे स्थलांतरित होतात. येथील पाणी कमी झाल्यावर पुन्हा नदीकडे मार्गक्रमण करतात. या मगरीच्या बाबतीत सुद्धा असे झाले असावे. मात्र यावेळी ओढ्यातील नायलॉनच्या रस्सीच्या झुबक्यामध्ये ती अडकली. रस्सी झाडाला अडकलेली असल्याने मगर अडकून पडली होती.**
> **-सागर दहिंबेकर,** वन्यजीव संरक्षक

मगरीला रेस्क्यू करण्यासाठी सागर दहिंबेकर, निलेश लोखंडे, सुरज दहीवडेकर, श्वेता विश्वकर्मा, संदेश यादव, नीरज म्हात्रे व सचिन सानप आणि वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी महत्वपूर्ण योगदान दिले.

# मुरूड पोलीस ठाण्यातील आरोग्य शिबिराला प्रतिसाद

**मुरुड : प्रतिनिधी**

के अर यु हेल्थ केअर पंचवटी नाशिक व मुरुड पोलीस ठाण्याच्यावतीने हृदय विकार पुरुषांसाठी व थायरॉईड (महिलांसाठी) मार्गदर्शन शिबिराचे आयोजन मुरुड पोलीस ठाण्यात करण्यात आले होते.



यावेळी डॉ. समिर मुन्सी, पोलीस निरीक्षक -प्रकाश सकपाळ, डॉ. चांदणी पोटकुळे, पोलीसशिपाई-विक्रांत बांधणकर, पोलीस नाईक- सागर रसाळ, पोलीस नाईकसुरेश वाघमारे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सचिन वाणी, सहाय्यक फौजदार- दिपक राउळ, पोलीस नाईक-लव गोंधळी, पोलीस हवालदार -युवराज निकाले, पोलीस हवालदार-घरत, जागन वाघरे, किसन बळी, एकंदरा व मुरुडचे कोळी समाजाचे महिला व पुरुष उपस्थित होते. या शिबिरात ६० जणांनी सहभाग नोंदविला.

डॉ. समिर मुन्सी यांनी मार्गदर्शन करतेवेळी म्हणाले की माणूस बोला की आजार आला. प्रत्येक आजाराला इलाज आहे पण आपले जीवन सध्या धकाधकीचा आहे. जीवनामुळे आपल्या आरोग्याकडे लक्ष देणे अनेकांना कठीण होत आहे. ही मोठी चिंतेची बाब आहे परंतु अशाच दुर्लक्षामुळे हृदयविकाराचा झटका आलेला देखील काही वेळा कळत नाही. केवळ छातीत दुखणं म्हणजे हृदयविकार असु शकतो हे पेशन्टला खरं वाटत नाही. हृदयविकार नेमका कसा ओळखायचा इथपासून ते त्यांचे प्रकार उपचार आणि त्याची इत्यंभूत माहिती असणं आवश्यक आहे. छातीत दुखणं असेल तर पहिले डॉक्टरांकडून तपासणी करून घ्यावी. यावेळी डॉक्टरांनी प्रात्यक्षिक करून दाखविली.

डॉ. चांदणी पोटकुळे यांनी महिलांना उद्भवणारा गर्भपिशवीचा आजार याविषयी मार्गदर्शन केले. थायराईड आजारामुळे स्त्रीच्या गर्भधारणेवर मोठा परिणाम होतो. तुम्हाला थायरॉईडचा त्रास असेल अशा स्त्रीने थायरॉईडची टेस्ट आवश्य करून घ्यावी. जर थायरॉईडवर उपचार केले नाहीत तर गरोदरपणात गंभीर समस्या होवू शकतात.

निरोगी जीवनशैली आणि पौष्टिक आहार घेत थायरॉइड ग्रंथीच्या अकार्यक्षमतेमध्ये सुधारणा आणता येते. याशिवाय औषधांच्या सेवनाने सुद्धा थायरॉइड नियंत्रणात ठेवण्यात आणि गरोदर राहण्यास मदत मिळते. थायरॉइडने ग्रस्त असलेल्या स्त्रियांनी अधिक खाणे टाळले पाहिजे. याशिवाय तळलेले मसालेदार पदार्थ आणि मिठाचा त्याग केला पाहिजे. अजून एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे थायरॉइड असणाऱ्या स्त्रीने गर्भधारणेपूर्वी एकदा डॉक्टरांचा सल्ला घ्यायला हवा. जेणेकरून काही समस्या असल्यास त्यावर वेळीच उपचार करता येतील, असे मार्गदर्शन डॉ. चांदणी पोटगुळे यांनी केले.

# भाजी मार्केटमधील 'कोर्लईची माय'



**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग, रोहा, मुरूड, पेण, महाड, श्रीवर्धन, तळा, माणगांव आदी तालुक्याच्या भाजी मार्केटसह गावागावात ताजी भाजी, विविध कडधान्य, रताळी, कलिंगड, काकडी, चिबूड आदीची विक्री करताना, एका वैशिष्टपूर्ण ख्रिश्चन पेहरावात व आगळी वेगळी भाषा बोलणारी कोर्लईची माय सर्वश्रुत आहे.

मुरूड तालुक्यातील कोर्लई, एतिहासिक व पारंपारिक वारसा सांगणारे गाव, कोर्लई किल्ल्याचा पोर्तुगिजाने ताबा सोडल्यावर काही पोर्तृगिज वंशज ख्रिश्चन बांधव येथेच राहिले,व येथे शेती, भाजी, विविध कडधान्य, रब्बी व हंगामी उत्पन्नाचे व्यवसाय करून उदरनिर्वाह करू लागले, चारशे वर्षानंतरसुध्दा हे कोर्लई गावात राहत असून त्यांनी अंगिकारलेला उत्पन्नाचे व्यवसाय अदयापी सुरु आहेत. कोर्लई ख्रिश्चन पाड्यातील हे ग्रामस्थ कष्टाळू असून शेतातून भातपीकासह पावसाळी,हिवाळी व उन्हाळी हंगामात मुळा, वांगी, टोमॅटो, कोंथिबीर, मिरची,आदी भाज्यासह सह काकडी, जिबूड तसेच विविध कडधान्ये यांचे उत्पन्न घेतात. कोर्लईतील ताजी भाजी व गावठी भाजी ही तालुक्यातील अलिबाग, रोहा, मुरूड,पेण, महाड, श्रीवर्धन,तळा आदी तालुक्याचे ठिकाणी तसेच रेवदंडा, चणेरा, नागाव, नांदगाव आदी गावागावात ग्राहकांच्या पहिल्या पंसतीची आहे. तर महाशिवरात्रीच्या सुमारास कोर्लईची प्रसिध्द रताळी ना, खुपच मोठी मागणी असते. ही वैशिष्टपुर्ण कोर्लईची रताळी खुपच प्रसिध्द असून ग्राहकांची मोठी मागणी असते. कोर्लईमध्ये उत्पन्न घेतली जाणारी भाजी, कडधान्ये, व रताळी विक्री करता, कोर्लई ख्रिश्चन पाड्यातील कोर्लईची माय प्रत्येक भाजी मार्केटमध्ये नित्याने आढळते. या कोर्लई ख्रिश्चन माय आगळी वेगळी अशी क्रिओल भाषा, कोर्लई ख्रिश्चन बांधव या भाषेस नौ लिन्ग (आमची भाषा) बोलत असतात. त्यामुळे ते निश्चित लक्ष्य वेधून घेतात. नित्याने भाजी मार्केटमध्ये आढळणारी कोर्लईची माय सर्वश्रृत असून कोर्लईची प्रसिध्द ताजी भाजी, कडधान्य, विशेष म्हणजे रताळी ग्राहकांपर्यंत पोहचवत

# दीपक म्हशीलकर यांना पोलीस उपनिरीक्षकपदी बढती

**मुरुड :**

मुरुड शहरात ज्यांचे बालपण व शिक्षण पूर्ण करून १ जून १९९३ रोजी पोलीस दलात रुजू झालेले दीपक जानू म्हशीलकर याना पदोन्नती देण्यात आली आहे. रायगड जिल्ह्याचे जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते त्यांना पदोन्नती देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे. यावेळी अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे उपस्थित होते.

म्हशीलकर हे पोलीस नाईक, पोलीस हवालदार, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक व तद्नंतर त्यांना पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. सुमारे ३० वर्ष सेवा त्यांनी पोलीस खात्यात बजावली आहे.

प्रामाणिक सेवा बजावून अखंड सेवेत त्यांनी अनेक कामगिरी करून प्रशासनानेचे लक्ष वेधून घेतले होते. रोहा कोलाड येथील खून खटल्यात पाच जणाना ताब्यात घेण्यात आले होते.

यातील आरोपी आपला गुन्हा कबूल करत नव्हते. त्यावेळी दीपक म्हशीलकर यांनी पोलीस खाक्या दाखवताच आरोपी बोलते झाले होते. रोहा पोलीस ठाण्यातील गुन्हेगार पकडण्यात त्यांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे. सध्या त्यांना रोहा पोलीस ठाणे अंतर्गत धाटाव दूरक्षेत्राचा कार्यभार सोपवला आहे.


## पेपर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, माझ्या अशीलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत १) श्री. बाळाराम नारायण वळवलकर उर्फ भोईर, २) श्री. दतात्रेय शंकर वळवलकर उर्फ भोईर, ३) कै. काशिनाथ मोठ्या वळवलकर उर्फ भोईर मयत तर्फे वारस, i) श्रीमती. उषा लक्ष्मण खुटले, ii) श्रीमती. शकुंतला नामदेव जळे, iii) श्री. धर्मराज काशिनाथ भोईर, iv) श्री. मनोहर काशिनाथ भोईर, v) श्रीमती. मोनिका प्रकाश भेंडे, यांच्यानावे अधिकार अभिलेखी नमूद असलेल्या भोगवटाधारकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. जिचे सविस्तर वर्णन खालील परिशिष्टामध्ये केलेले असून, यापुढे या जमिनीस संक्षिप्तपणे 'सदरहू मिळकत' असे उल्लेखलीले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - वडवली, ता पनवेल व जिल्हा रायगड**

| गट क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ४६ | २ | ०-१२-९०<br>पो.ख ०-०१-८०<br>एकुण ०-१४-७० | २.६९ |

तरी वरील सदरहू मिळकतीबाबत, अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार, ताबाकब्जा, कुळवहिवाट, इजमेंट, समझोता करार, साठेकरार, विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, वारसाहक्क, ट्रस्ट, न्यास, भाडेपट्टा, सबलीज, अंडरलीज, लियन वगैरे असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत, खाली सही करणार, खरेदीदारांचे वकील यांच्या खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह, लेखी हरकती रजिस्टड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे, मुदतीत हरकती प्राप्त न झाल्यास, सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे, असे समजून आमचे अशील सदर मिळकती संदर्भातील सर्व व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती, आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

दिनांक : २५/०२/२०२३

सही/-
**ॲड. सदिच्छा दिलीप अस्वले**
२०३, मोहिनील अपार्टमेंट, नवे पोपुड, म्हातवली, उरण, रायगड
पिन कोड - ४००७०२. मोबाईल नं. ७४०००९७२८६



## पेपर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली सामाईक मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **अनंत जनार्दन घरत, वत्सलाबाई वसंत चरीकर, हिराबाई गोवर्धन मुंब्रेकर,** यांचेकडून श्री. अनिल कुमार पाण्डेय, सौ. जया अनिल पाण्डेय कायमस्वरुपी विकत घेण्याबाबतचा व्यवहार आमचे अशिल यांनी ठरविला आहे व या व्यवहाराची जाहीर नोटीस वर्तमानपत्रात देण्याबाबत विद्यमान मालक **अनंत जनार्दन घरत, वत्सलाबाई वसंत चरीकर, हिराबाई गोवर्धन मुंब्रेकर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे विंधणे (५५३३२४)**
**(युनिक आय.पी.नं. १६६९९८८३५८१), तालुका - उरण, जिल्हा - रायगड**

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १६५/१ | १ | १.२८.६०<br>पो.ख. ०.१७.०० | ८.४४ |
| | | एकुण १.४५.६० | |
| या एकुण क्षेत्रापैकी विक्रेते यांच्या हिश्याचे ०.१६.०० गुंठे | | | |

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेष आहेत असे गृहीत धरून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीख व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : २५ फेब्रुवारी २०२३

सही/-
**ॲड. निलेश बा. झंजाड**
बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक -३३/३४,
सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा-रायगड - ४१०२०६
मो. क्र. ९९२०४७५८०१



**महापारेषण**
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

## जाहिर सूचना

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतुन वीजतंत्री या व्यवसायात राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) उत्तीर्ण उमेदवारांना सुचित करण्यात येते की, अउदा संवसु मंडळ, पनवेल अंतगर्त वर्ष २०२३-२४ करिता शिकाऊ उमेदवारांना एक वर्ष कालावधीसाठी करारबध्द करण्यात येणार आहे. पात्र उमेदवारांनी **https://www.apprenticeshipindia.org** या संकेतस्थळावर शिकाऊ उमेदवारीकरिता दि. १०.०३.२०२३ पर्यंत आस्थापना नोंदणी क्रमांकावर ऑनलाईन अर्ज सादर करावे. आस्थापना नोंदणी क्रमांक व शिकाऊ उमेदवारी पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहेत.

| अनु. क्र. | नाव | आस्थापना नोंदणी क्रमांक | वीजतंत्री |
|---|---|---|---|
| १ | M.S.E.T.C.L<br>EHV O&M Circle, Panvel | E09162700835 | ६७ |

२. शैक्षणिक अर्हता उमेदवारांनी सादर करावयाचे दस्तऐवज, विद्यावेतन तसेच इतर अटी व शर्तीच्या माहितीसाठी कंपनीच्या **www.mahatransco.in** या संकेतस्थळावर ''ताज्या बातम्या आणि अद्यतने'' (Latest News & Updates) या सदराखाली प्रसिध्द करण्यात आलेली सूचना पाहावी.

**स्वाक्षरी/-**
**अधीक्षक अभियंता**
**अउदा संवसु मंडळ, पनवेल**



**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## E-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered SRM vendors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender / RFx No. | Description | Estimated Cost | Due Date & Time (Hrs) |
|---|---|---|---|---|
| 1 | E-Tender-2/ 22-23 **RFx No. 7000026178** | **Extension-I** of SRM E-Tender for Providing Daily Sweeping/Cleaning Services alongwith Cleaning Materials at office, godown & yard area of Major Stores, Panvel for the FY 2023-24 | Rs. 3.20 Lakh (Incl. Taxes) | 24.02.2023, 00:00 Hrs. to 02.03.2023, 23:59 Hrs. |
| **EMD:** Rs. 5,000/- **Tender Fee:** 590/- incl. GST for submission of bids. | | | | |

For further details, visit our website: **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Details :** EE. Mob. No. 9769006220/DY EE. Mob. No. 9930057633
**Note:** All eligible Suppliers/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**Major Stores, Panvel**



**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors / agencies on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for the following work.

**Tender No.:** EE/400kV/RS (O&M)/ DN/KHR/Ten-1/2023-24 **(RFx No. 7000026283)**
**Period for Submission of E-Bid:** 22.02.2023 to 01.03.2023 up to 23:59 Hrs
**Name of Work:** Providing Services Housekeeping and Garden Maintenance to 400kV R.S. (O&M) Dn., Kharghar

| Estimated Cost (in Rs.) | EMD (in Rs.) | Tender Fee (in Rs.) | Closing Date | Technical Opening Date | Commercial Opening Date |
|---|---|---|---|---|---|
| 4,67,420.96 (Including GST) | 5,000/- | 500/- + GST | 01.03.2023 up to 23:59 Hrs | 02.03.2023 at 10:00 Hrs (If possible) | 02.03.2023 at 10:15 Hrs (If possible) |

**Contact Persons:** (1) Mr. S.J. Darekar, Executive Engineer (I/c.), 400kV RS O&M Dn., Kharghar, 9619892040
2) Ms. P.C. Deshpande, Dy.EE (O), 400kV RS O&M Dn., Kharghar, 9819313988
For further details, visit our website **www.mahatransco.in**

1) Tender documents can be downloaded by online only from aforesaid website.
2) Eligible contractor should submit their bid well in advance instead of waiting till last date.

**MSETCL will not be responsible for non-submission of Bid due to any website related problems.**

**Note:** All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tender (New) portal: **https://srmetender.mahatransco.in**

**Sd/-**
**Executive Engineer**
**400kV R.S. (O&M) Dn., Kharghar**

## निवडक

### ज्येष्ठ नागरिकांना आरोग्याबाबत मार्गदर्शन



**पनवेल** : ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभागृहात ज्येष्ठ नागरिकांसाठी प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणीचे महत्त्व याबाबत लाईफ लाईन हॉस्पिटलच्या वैद्यकीय संचालिका डॉ. जयश्री पाटील यांनी मार्गदर्शन केले, तसेच हॉस्पिटलच्या वैद्यकीय टीममार्फत जवळपास १०० हून अधिक ज्येष्ठ नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. या वेळी संघाचे अध्यक्ष जयंत गुर्जर, उपाध्यक्ष माधुरी गोसावी, सचिव खेडेकर व सभासद उपस्थित होते.

### मोबाईल हिसकावून चोरटा पसार

**पनवेल** : मोबाईल हिसकावून चोरटा पसार झाल्याची घटना रेल्वे प्रवासादरम्यान घडली आहे. रेल्वेप्रवासी दत्तात्रेय जाधव हे पनवेल येथून बेलापूर येथे कामासाठी जात असताना अज्ञात चोरट्याने त्यांच्या खिशातील मोबाईल हिसकावून तो पसार झाल्याने याबाबतची तक्रार पनवेल रेल्वे पोलीस ठाण्यात नोंदवण्यात आली आहे.

### मराठी भाषा दिनानिमित्त कविसंमेलन

**उरण** : मराठी राज्य भाषा दिन सोमवारी (दि. २७) असल्यामुळे श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेच्या माध्यमातून शहरातील विमला तलाव गार्डन येथे तालुका स्तरीय कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. कविसंमेलनाचे उद्घाटक म्हणून ज्येष्ठ साहित्यिक एल. बी. पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. या कविसंमेलनाला जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### चालकानेच केला लाखोंचा अपहार

**पनवेल** : किराणा माल वाहतूक करणाऱ्या चालकानेच ग्राहकाकडून मिळालेले पैसे कंपनीमध्ये परत जमा न करता अपहार केल्याची घटना पनवेल तालुक्यातील रोहिंजण येथे घडली आहे. याप्रकरणी चालकाविरोधात तळोजे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जयदिप पवार (वय २७) यांचा ट्रान्सपोर्टचा व्यवसाय असून त्यांनी दिलशर कंपनी व अदानी कंपाउंड या ठिकाणी एक लाख ११ हजार ७६ रुपयांचा किराणा माल पोहोच केला होता. या मालाचे पैसे ग्राहकांनी चालक अजमल हुसेन रेशम अली याच्याकडे सुपूर्द केले. ग्राहकाकडून मिळालेल्या डिलेव्हरीचे पैसे त्याने कंपनीमध्ये परत न भरता अपहार केला.

# दिघा रेल्वेस्थानकातील सुविधांबाबत लवकरच बैठक

## आमदार गणेश नाईक यांनी केली प्रत्यक्ष पाहणी

**नवी मुंबई : बातमीदार**

ट्रान्स हार्बर मार्गावरील पूर्णत्वाकडे जात असलेल्या दिघा नवीन स्थानकाच्या कामाची पाहणी शुक्रवारी (दि. २४) आमदार गणेश नाईक यांनी केली. दिघा स्थानकामध्ये प्रवाशांना जास्तीत जास्त सुविधा मिळवून देण्याविषयी तसेच येथील अडचणींवर उपाययोजना करण्यासाठी रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्याबरोबर येत्या ३ मार्च रोजी बैठक होणार असल्याची माहिती आमदार गणेश नाईक यांनी या वेळी दिली.



या पाहणी दौऱ्यावेळी माजी खासदार संजीव नाईक, माजी आमदार संदीप नाईक, माजी महापौर सुधाकर सोनवणे, महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत, स्थायी समितीच्या माजी सभापती नेत्रा शिर्के, स्थानिक नगरसेवक आणि स्थायी समितीचे माजी सभापती नवीन गवते, भाजपचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, एमआरव्हीसी आणि रेल्वे प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

दिघा स्थानकाचे काम सुरू आहे. या स्थानकामधील सर्व कामे पूर्ण झाल्यानंतर लवकरात लवकर या स्थानकाचे लोकार्पण होईल, अशी आशा आमदार नाईक यांनी व्यक्त केली. ते म्हणाले, २००९ साली तत्कालीन खासदार डॉ. संजीव नाईक यांनी दिघा रेल्वेस्थानकाची मागणी केली होती आणि हे स्थानक उभे राहण्यासाठी त्यांनी पाठपुरावा केला आहे. या स्थानकाला स्थानिकांच्या मागणीनुसार दिघा रेल्वे स्थानक असे अधिकृत नाव मिळायला हवे. खैरणे-बोनकोडे स्थानक होणे हीदेखील काळाची गरज आहे. येथील स्वच्छतेची जबाबदारी नवी मुंबई महापालिकेला देऊन त्या मोबदल्यात जाहिरातीच्या माध्यमातून उत्पन्न कमविण्याचे अधिकार महापालिकेला द्यावेत, अशी सूचनादेखील आमदार नाईक यांनी केली आहे. स्थानिक नगरसेवक नवीन गवते यांनी मागण्यांचे निवेदन आमदार नाईक यांना दिले असून त्यांना स्थानिकांच्या मागण्या पूर्ण करण्याची विनंती केली आहे. या स्थानकाच्या निर्मितीसाठी अंदाजे ९० कोटींचा खर्च करण्यात आला आहे.

> **दिघा रेल्वेस्थानक खुले झाल्यानंतर दिघावासीय आणि या भागातील औद्योगिक क्षेत्रामध्ये येणाऱ्या-जाणाऱ्या लाखो कामगारांना ठाण्याकडे जाण्यासाठी ऐरोली स्थानकात जाण्याचा फेरा वाचणार आहे. दिघा स्थानकातून आता थेट ठाणे स्थानकात जाता येणार आहे त्यामुळे प्रवाशांचा वेळ आणि पैसा वाचणार आहे.**
>
> **-संजीव नाईक, माजी खासदार**

### प्रवाशांच्या सुरक्षेसाठी स्कायवॉक उभारणार

**दिघा रेल्वेस्थानकासमोरील रस्ता अतिशय वर्दळीचा असून येथून रस्ता ओलांडणे धोक्याचे आहे. छोटे-मोठे अपघात वारंवार या ठिकाणी होताना दिसतात. ही बाब लक्षात घेता लोकनेते आमदार गणेश नाईक यांनी राज्य सरकारकडून ऐरोली विधानसभा क्षेत्रासाठी मंजूर करून आणलेल्या दहा कोटी रुपयांच्या विशेष निधीमधून दीड कोटी रुपये खर्चून दिघा रेल्वेस्थानकासमोर स्कायवॉक बांधण्यात येणार आहे.**

### कल्याण जंक्शनला नवी मुंबई जोडली जाणार

**भविष्यामध्ये दिघा स्थानकातून एलिव्हेटेड मार्गाच्या माध्यमातून कळवा आणि पुढे कल्याण रेल्वे जंक्शन अशी संलग्नता निर्माण होणार आहे. त्याबाबतचे काम प्रगतिपथावर आहे. ५१९ कोटी रुपयांचा निधी या रेल्वे प्रकल्पासाठी तरतूद करण्यात आली असून एमआरव्हीसी पहिल्यांदाच अशा प्रकारे एलिवेटेड मार्गाची निर्मिती करीत आहे. एकूण ५१९ कोटी निधीमधून ९० कोटी रुपये निधी दिघा स्थानकासाठी खर्च करण्यात आले आहेत.**

# तळोजा औद्योगिक क्षेत्रात वायू पातळीचे परीक्षण

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा औद्योगिक क्षेत्रात रासायनिक कारखान्यांमधून हवेत सोडल्या जाणाऱ्या वायूच्या पातळीचे परीक्षण करण्यासाठी विशेष तपास पथक (एसआयटी) गठीत करून तीन आठवड्यांत अहवाल सादर करावा, असे आदेश लोकायुक्त व्ही. एम. कानडे यांनी शासनाच्या पर्यावरण विभागाला दिले.

या वेळी पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर, राज्य पर्यावरण विभागाचे अधिकारी, आदर्श सामाजिक संस्थेचे राजीव सिन्हा, अंकुश गायकवाड, सुनील पाटील तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी उपस्थित होते.

तळोजा औद्योगिक क्षेत्रातून रात्री सोडण्यात येणाऱ्या केमिकलच्या उग्र वासामुळे तळोजा, खारघर, रोडपाली, कळंबोली आणि जवळपास असलेल्या गावातील नागरिकांना त्रास होत असल्याची तक्रार तळोजामधील आदर्श सामाजिक संस्थेने मुंबई लोक आयुक्तांकडे केली होती. प्रथम सुनावणीवेळी लोकायुक्तांनी केमिकलच्या उग्र वासामुळे परिसरातील नागरिकांना होणाऱ्या समस्यांविषयी लेखी माहिती राज्य सरकार आणि लोक आयुक्त कार्यालयात सादर करण्यात यावे, असे आदेश दिले होते.

> **एसआयटी गठीत करण्याचे लोकायुक्तांचे आदेश**

त्यानुसार नवी मुंबईतील महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी पथकासमवेत औद्योगिक क्षेत्रात केलेल्या पाहणीत केमिकलयुक्त उग्र वास येत असल्याचे निदर्शनास आले.

पनवेल तहसीलदार विजय तळेकर यांच्या कार्यालयाकडून निर्माण करण्यात आलेल्या पथकाने पाहणी केली असता, तळोजा औद्योगिक परिसर आणि जवळपासची गावे आणि वसाहतीमध्ये केलेल्या पाहणीत उग्र वास येत असल्याचा अहवाल सादर केला होता.

यासंदर्भात पनवेल तहसील कार्यालयाकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर लोकायुक्त कानडे यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला आणि तळोजा एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांनी कोणत्या कंपनीतून हानिकारक वायू आणि घातक वायू सोडले जात आहेत, ते शोधून काढण्याचे निर्देश दिले, तसेच प्रदूषण नियंत्रण मंडळने प्रदूषण तसेच जल आणि हवेची गुणवत्ता मोजमाप करणारे मीटर किंवा तांत्रिक उपकरणे बसवावीत, अशी सूचना केली.

# गुगलवरून कस्टमर केअरचा नंबर शोधणे पडले महागात

## महिलेची ७५ हजारांची फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

गुगलवरून कस्टमर केअरचा नंबर शोधून संपर्क साधणे महिलेला चांगलेच महागात पडले आहे. अज्ञात व्यक्तीने युपीआय आयडी व मोबाइल कमांकद्वारे महिलेची ७५ हजारांनी ऑनलाईन आर्थिक फसवणूक केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी महिलेने तत्काळ धाव घेत पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

मिल्क बास्केट ॲपच्या माध्यमातून काही स्कीम मिळत नसल्याने फिर्यादी महिलेने गुगलवर ॲपच्या कस्टमर केअरचा नंबर सर्च करून संपर्क साधला असता अज्ञात व्यक्तींनी स्किममधील पैसे रिफंड मिळण्याकरिता फिर्यादीच्या व्हॉटसॲप कमांकावर फॉर्म पाठवून त्यामध्ये फिर्यादी यांचे बँकेचा युपीआय आयडी व मोबाइल कमांक व इतर माहिती भरण्यास सांगितली. त्याद्वारे ७४ हजार २९९ रुपये परस्पर काढून घेऊन ऑनलाईन आर्थिक फसवणूक केली.



**कळंबोली : भाजप कळंबोली मंडळाची बैठक बुधवारी झाली. या बैठकीत उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीसपदी माजी नगरसेवक नितीन पाटील यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करून सत्कार करण्यात आला.**

# न्हावे विद्यालयात एसएससी विद्यार्थ्यांचा शुभचिंतन सोहळा

**न्हावे : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या न्हावे येथील न्यू इंग्लिश स्कूलमधील एसएससीच्या विद्यार्थ्यांचा शुभचिंतन समारंभ विद्यालयाचे चेअरमन चंद्रकांत भोईर यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात झाला.

समारंभाचे प्रमुख पाहुणे रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य तथा माजी सचिव महात्मा फुले कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. गणेश ठाकूर यांनी विद्यालयाची १०० टक्के निकालाची परंपरा ठेवण्यासाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

या शुभचिंतन सोहळ्यानिमित्त स्कूल कमिटीचे ज्येष्ठ सदस्य किसन पाटील, न्हावे ग्रामपंचायतचे सरपंच व स्कूल कमिटी सदस्य हरिश्चंद्र म्हात्रे, उपसरपंच प्रल्हाद पाटील व ग्रामसुधारणा मंडळाचे अध्यक्ष शैलेश पाटील यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रमोद कोळी यांनी केले.



# रोटरी क्लब मोहोपाड्यात उभारणार नवीन बसथांबा

**मोहोपाडा, रसायनी : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा परिसरातील बाजारपेठेचे मुख्य केंद्रबिंदू म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मोहोपाडा शहरात प्रवेशद्वारानजीक बसथांब्याची दूरवस्था झाल्याने नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. ही समस्या रोटरी क्लबचे अध्यक्ष अमित शहा यांनी लक्षात घेऊन त्याजागी नवीन बसथांबा उभारण्याचे ठरवून त्यांचे भूमिपूजन माजी सरपंच संदीप मुंढे यांच्या हस्ते करण्यात आले.



रसायनी पाताळगंगा हे औद्योगिक क्षेत्र असल्याने मोहोपाडा परिसर नेहमीच गजबजलेला असतो. येथे बाजारहाट करण्यासाठी येणाऱ्या नागरिकांची संख्याही लक्षणीय आहे. येथील नागरिकांना एसटी बसची वाट पाहत मोहोपाडा मच्छिबाजाराजवळील बस थांब्यावर उभे राहावे लागत होते. येथील बसथांब्याची डागडुजी करावी अथवा नवीन व्हावे असे प्रवासी वर्गातून मागणी होत होती. त्यामुळे रोटरी बसथांब्याची डागडुजी करण्याचे ठरविले आहे.

या वेळी मोहोपाडा नवीन पोसरी व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष प्रदीप पाटील, रोटरी क्लबचे अध्यक्ष अमित शहा, सेक्रेटरी धिरज जैन, सहाय्यक सेक्रेटरी विजय पाटील, खजिनदार देवेंद्र महिंद्रकर, माजी अध्यक्ष गणेश काळे, बाळकृष्ण होनावळे, पिई रेश्मा कुरुप, शानबाग, संदिप साबळे, मनोहर पाटील आदी उपस्थित होते.



**पनवेल : सोशल मीडिया ट्विटरवर एका स्वयंघोषित विद्रोही कवी समजणाऱ्या तुषार दामगुडे नामक व्यक्तीने न्यायालयावर केलेल्या हीन आणि विकृत वक्तव्यामुळे या व्यक्तीवर त्वरित गुन्हा दाखल करून कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी भाजप सोशल मीडिया सेलचे शहर संयोजक प्रसाद हनुमंते यांनी केली आहे. या संदर्भातील निवेदन त्यांनी भाजप रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील तसेच ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक विजय कादबाने यांना दिले. या वेळी उमेश इनामदार, महेश सरदेसाई, रुपेश नागवेकर, प्रीतम म्हात्रे उपस्थित होते.**

# आवक घटल्याने हिरव्या मिरचीचा दर वधारला

## इतर भाज्यांचे दर झाले कमी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

एपीएमसी बाजारात हिरवी मिरचीची आवक कमी होत असल्याने हिरव्या मिरचीचा दर घाऊक बाजारामध्ये वधारला आहे. याआधी घाऊक बाजारात प्रतिकिलो ३० रुपयांवर उपलब्ध असलेली मिरची आता ४०-४६ रुपयांवर पोहोचली आहे. १० ते १५ रुपयांनी भाव वधारले आहेत.

एपीएमसी बाजारात महाराष्ट्र, कर्नाटक, उत्तर प्रदेश येथून हिरवी मिरची दाखल होत असते. सध्या बाजारात २०३९ क्विंटल मिरची दाखल होत आहे, मात्र मागणीपेक्षा पुरवठा कमी होत असल्याने दरवाढ झाली आहे, तर दुसरीकडे सर्व भाजीपाल्यात भाव खाणारी भेंडी आता स्वस्त झाली आहे. त्याचबरोबर वांगी आणि शिमला मिरचीचे दरही कमी झाले आहेत.

बाजारात भेंडीची १२०१ क्विंटल आवक असून प्रतिकिलो ४० रुपयांवरून आता ३४ रुपयांनी उपलब्ध आहे. वांगीची २३४ क्विंटल आवक असून २४-३६ रुपयांनी विक्री होती, त्यात घसरण झाली असून १६-१८ रुपये आहे. १,३३२ क्विंटल शिमला मिरची दाखल झाली असून १६-२४ रुपये दराने विक्री होत आहे.






### जाणून घ्या साहित्यिकांच्या आवडत्या पुस्तकांविषयी...

वाचाल तर वाचाल हे नवे सदर दर महिन्याच्या पहिल्या आणि चौथ्या रविवारी 'दैनिक राम प्रहर'च्या अंकात वाचा. या सदरात वाचा निवडक साहित्यिकांनी वाचलेल्या पुस्तकांविषयीचे रसग्रहण.

येत्या रविवारी, २६ फेब्रुवारी २०२३ रोजी वाचूया ज्येष्ठ कवी, लेखक अशोक लोटणकर यांच्या आवडत्या पुस्तकांविषयी त्यांच्याच लेखातून.

# एड्‌ससह लैंगिक आजाराबाबत जनजागृती

## ■ जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुहास माने यांचे मार्गदर्शन



**अलिबाग : प्रतिनिधी**

आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय अंतर्गत राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रम, नवी दिल्ली व महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी मुंबई यांच्या आदेशानुसार जिल्हा एड्स नियंत्रण व प्रतिबंध विभाग, जिल्हा सामान्य रुगणालयांतर्गत जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुहास माने यांच्या मार्गदर्शनानुसार रायगड जिल्ह्यात लोककलेच्या माध्यमातून एचआयव्ही एड्स व लैंगिक आजाराबाबत जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

रायगड जिल्ह्यातील प्रिझम सामाजिक विकास संस्था,अलिबाग संस्था प्रमुख श्रीमती तपस्वी नंदकुमार गोंधळी यांच्या माध्यमातून आंबेडकर पुतळा, जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग, रिक्षा स्टॅन्ड बोर्ली, जे.एस.डब्लू पेण (वडखळ), मांडवा जेट्टी या ठिकाणी तसेच स्वयंसिद्धा सामाजिक विकास संस्था, रोहा, संस्था प्रमुख श्रीम.सुचिता साळवी यांच्या माध्यमातून यांच्यामार्फत एस,टी. स्टॅन्ड रोहा, एलएनटी कॉलनी, नागोठणे, पाली, एस,टी. स्टॅन्ड माणगाव, लोणेरे फाटा या ठिकाणी आणि कलारंग सांस्कृतिक सामाजिक संस्था, नारंगी, अलिबाग संस्था प्रमुख श्री.प्रकल्प वाणी यांच्या माध्यमातून यांच्यामार्फत मोहोपाडा, कर्जत रेल्वे स्टेशन, एस,टी. स्टॅन्ड उरण, एस,टी. स्टॅन्ड पनवेल, चिडूकपाडा कळंबोली या ठिकाणी दि. २२ फेब्रुवारी २०२३ ते दि.२४ फेब्रुवारी २०२३ पर्यंत कलापथकांच्या माध्यमातून एचआयव्ही एड्स जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या पथनाटयाच्या माध्यमातून एचआयव्ही एड्स म्हणजे काय, त्याची कारणे, लक्षणे, समज गैरसमज, २०१७ कायदा आयसीटीसी, टोल फ्री क्र.१०९७, छ-उज-झझ या विषयी प्रथम लोकगीतांच्या माध्यमातून पटवून देण्यात येणार आहे. एचआयव्हीची संसर्ग होण्याचे महत्वाचे चार मार्ग. यामध्ये एचआयव्ही संसर्गित व्यक्तीसोबत असुरक्षित लैंगिक संबंध, वारंवार एचआयव्ही संसर्गित व्यक्तीची तिच ती सुई व सिरिंजचा वापर केल्याने, एचआयव्ही संसर्गित रक्त दिले गेल्यास व एचआयव्ही संसर्गित पालकांकडून होणाऱ्या बाळाला एचआयव्ही संसर्ग होऊ शकतो. याकरिता प्रत्येक नागरिकांनी तसेच गरोदर मातांनी सरकारी दवाखान्यातील समुपदेशन व तपासणी केंद्रातून आपली एचआयव्हीची तपासणी करून घेणे आवश्यक आहे. तसेच नेहमी नवीन सुईचा वापर करणे, रक्ताची अत्यंत आवश्यकता भासल्यास प्रमाणित रक्तपेढीतून रक्त घेणे तसेच एचआयव्ही संसर्गित आढळल्यास मोफत औषधोपचार घेणे अत्यंत आवश्यक आहे, अशी प्रबोधनपर माहिती देऊन पथनाट्याच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे. रायगड जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी या कार्यक्रमाचा लाभ घेऊन आपली एचआयव्ही तपासणी करून घेण्यात यावी, असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुहास माने यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी जिल्हा एड्स नियंत्रण व प्रतिबंध विभागांतर्गत जिल्हा सामान्य रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालयातील कार्यरत असलेले समुपदेशक व प्रयोगशाळा तंत्रज्ञ तसेच महाराष्ट्र सामाजिक विकास संस्था पेण, लोकपरिषद संस्था पनवेल, आधार ट्रस्ट पनवेल, सक्षम संस्था रोहा, परिवर्तन संस्था पनवेल यांची मदत घेण्यात येत आहे.

**विविध संस्थांसह कलाकार घेताहेत अथक परिश्रम**

प्रिझम सामाजिक विकास संस्था, अलिबागचे कलावंत सार्थक गायकवाड, प्रगती कासार, पार्थ म्हात्रे, श्रुती नाईक, राज पाटील, यश म्हात्रे, स्वरांगी मोहरे यांनी तसेच स्वयंसिद्धा सामाजिक विकास संस्था, रोहा व कलारंग सांस्कृतिक सामाजिक संस्था, नारंगी, अलिबाग यातील कलाकारांनी अथक परिश्रम घेतले आहेत.

# श्रीवर्धन आगारामध्ये नव्या पाच 'लालपरी' दाखल

## ■ चार मार्गांवर फेऱ्या सुरू; प्रवासी सुखावले

**म्हसळा : प्रतिनिधी**

कोरोना काळामध्ये मागील २-३ वर्षात महामंडळात नवीन एसटी बस दाखल होत नव्हत्या. जुन्या बसेसची अवस्था अतिशय वाईट झाली होती. या सर्व बाबी लक्षात घेत एसटी महामंडळाने रायगड विभागासाठी ५० नवीन लालपरी बस देण्याचा निर्णय घेतला आहे. प्रथम प्राधान्य श्रीवर्धन आगाराला मिळाले आहे. आगारांत ५ बसेस दाखल झाल्या असून त्या पुढील मार्गावर व वेळेवर सुरु आहेत.

टू बाय टू आसन व्यवस्था असणाऱ्या या बस आहेत. बारा मीटर लांबीच्या बस असून प्रशस्त आसन व्यवस्था करण्यात आली आहे. प्रत्येक सीटला मोबाईल चार्जर आहे. लांब पल्ल्याच्या प्रवासात प्रवाशांना या बसमध्ये त्रास होणार नाही. या बसच्या दरात कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही.

भविष्यकाळात नवीन बसची संख्या आणखी वाढविण्यात येणार आहे. पुढे व मागे बाजूला कॉईल संस्पेंशन असल्याने प्रवास सुखकर होतो. बस खाजगी तत्वावर आहे. एस.टी परंपरेनुसार दर्जेदार सेवा देण्यासाठी कंडक्टर एसटी महामंडळाचा, तर ड्रायव्हर खाजगी आहे.

सर्वप्रथम एसटी महामंडळाला तोट्यातून बाहेर काढणे हा मुख्य हेतू आहे. एसटी महामंडळाचे सक्षमीकरण करणे, गतिमानता वाढवणे, अपघाताचे प्रमाण कमी करणे, प्रवाशांच्या सोयीसाठी बसच्या फेऱ्या वाढवणे, प्रवाशांना आरामदायक सुरक्षित लांब पल्ल्याचा प्रवास करण्यासाठी नवीन पद्धतीच्या बस उपलब्ध करून देणे असे अनेक उद्दिष्ट समोर ठेवून एसटी महामंडळ नवीन पद्धतीने काम करत आहे.



**असे आहे बसचे वेळापत्रक :**

१) श्रीवर्धन ते नालासोपारा सकाळी ७ वा.
-नालासोपारा ते श्रीवर्धन रात्री १० वा.
२) श्रीवर्धन-लातूर-श्रीवर्धन सकाळी ५ वा.
लातूर-श्रीवर्धन सकाळी ६.३० वा.
३) श्रीवर्धन-भाईंदर दु. २ वाजता,
भाईंदर-श्रीवर्धन सकाळी ६ वा.
४) श्रीवर्धन- सातारा सकाळी ५.४५ वा.
सातारा-श्रीवर्धन दु. १.३० वाजता

# विहूर पुलाच्या रस्त्याकडे प्रशासनाचे होतेय दुर्लक्ष



**मुरुड : प्रतिनिधी**

मुंबई-मुरुड या मुख्य रस्त्याला जोडणारा वीहूर पूल अत्यंत महत्वाचा असताना सुधा केवळ दोनशे मीटर रस्त्याला कार्पेट टाकण्याचा विसर बांधकाम खात्यास पडल्याने आज असंख्य प्रवासी यांना धूळ व खाच खळग्यातून प्रवास करावा लागत आहे. सन २०२१च्या मुसळधार पावसामुळे विहूर् पुलाच्या दोन्ही बाजूचे संरक्षक कठडे वाहून जाऊन येथे मोठ मोठे खड्डे पडले होते. स्थानिक पत्रकार यांनी पाठपुरावा केल्यामुळे पुलाच्या दोन्ही बाजूच्या संरक्षक भिंत काँक्रीटच्या बांधण्यासाठी लाखो रुपयांचा निधी प्राप्त झाला.

निधी प्राप्त होऊन वर्ष झाले असताना देखील संबंधित ठेकेदार काम सुरू करीत नव्हता यावर खूप गदारोळ झाल्यावर ठेकेदाराने हे काम सुरू केले. सध्या वीहूर् पुलाच्या दोन्ही बाजूकडील संरक्षक भिंत बांधण्याचे काम पूर्ण झाले आहे. आता संरक्षक लोखंडी पाईप बसवण्याचे काम शिल्लक आहे.

मागील दोन वर्षापासून हे काम प्रलंबित राहिल्याने या पुलाच्या आजूबाजूकडील किमान दोनशे मीटरचा परिसर हा खड्डेमय झाला आहे.

या पुलाकडील सर्व बाजूने डांबरी कार्पेट मारणे खूप आवश्यक आहे. परंतु याकडे दुर्लक्ष झाल्याने असंख्य प्रवाशांना धूळ व खाचखळग्यातून प्रवास करावा लागत आहे. किमान दोनशे मीटरचे तरी कार्पेट डांबरीकरण करून असंख्य प्रवाशी यांना दिलासा द्यावा अशी मागणी बांधकाम खात्याकडे होत आहे.

मे अखेरपर्यंत कार्पेट न केल्यास पावसाळ्यात या पुलाजवळ मोठ मोठे खड्डे होऊन प्रवासी लोकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागणार आहे. तेव्हा बांधकाम खात्याने लवकरात लवर कार्पेट करावे अशी मागणी प्रवासी करीत आहेत.

# व्यसनापासून दूर रहा, हुंडा देऊ नका!

## अलिबागच्या विद्यार्थ्यांनी केली पथनाट्यातून जनजागृती



**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग शहरातील सेंट मेरी कॉन्व्हेन्ट शाळेच्या विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्ती, जंक फूड, मतदान आणि हुंडाबळी या आजच्या काळातील गंभीर विषयावर पथनाट्य करून नागरिकांमध्ये जनजागृती केली आहे. शहरातील एसटी स्थानक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, रिलायन्स बाजार, पीएनपी नगर याठिकाणी शाळेतील विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर करून नागरिकांना व्यसनापासून दूर रहा, हुंडा देऊ नका, मतदान हक्क बजावा आणि जंक फूडच्या आहारी जाऊ नका, असा संदेश दिला आहे.

आज तरुण पिढी व्यसनाधीन होताना दिसत आहे. व्यसनाच्या आहारी गेल्याने स्वतच्या शरीराची हानी तर होतेच त्याचबरोबर कौटुंबिक स्वस्थाही बिघडले जात आहे. त्यामुळे व्यसनापासून दूर रहा आणि आनंदी आयुष्य जगा असा संदेश सेंट मेरी शाळेच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्यतून दिला आहे. मतदान हा आपला हक्क आहे तो बजावला पाहिजे. मतदान केल्याने लोकशाही जिवंत राहत आहे. मतदान प्रक्रिया कशी चालते आणि त्यामुळे काय फायदा होतो याचे उत्तम सादरीकरण पथनाट्यातून करण्यात आले.

सेंट मेरी शाळेच्या विद्यार्थ्यांनी चारही घेतलेले विषय हे समजाशी निगडित होते. त्यातून जनजागृती करून विद्यार्थ्यांनी चांगला संदेश नागरिकांना दिला आहे. शाळेच्या मुख्याध्यापिका सिस्टर बरेल याच्या संकल्पनेतून ही पथनाट्य सादर केली. यावेळी शाळेच्या शिक्षिका, विद्यार्थी तसेच नागरिकांनी सहभाग देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

**जंक फूड खाणे आरोग्याला अपायकारक**

हुंडा देणे हे कायद्याने गुन्हा आहे. मात्र आजही काही समाजात मुलीच्या कुटुंबाकडून हुंडा घेतला जात आहे. हुंडा न दिल्याने निष्पाप मुलीचा बळी जात आहे. हुंडा देऊ नका असा संदेश पथनाट्यातून विद्यार्थ्यांनी समाजाला दिला आहे. हल्ली जंक फूड खाण्याचे परिणाम वाढू लागले आहे. जंक फूड खाल्याने आपल्या शरीराला घातक आहे. त्यामुळे अती जंक फूड खाणे आरोग्यास अपायकारक आहे असा संदेश सेंट मेरीच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्यातून दिला आहे.

# दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**मुरुड : प्रतिनिधी**

श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंतनगर नांदगाव हायस्कूल येथील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ पार पडला. अध्यक्षस्थानी चेअरमन फैरोझ घलटे होते. कार्यक्रमासाठी संचालक कृष्णा अंबाजी, संचालक अरविंद भंडारी, पर्यवेक्षक श्रीधर ओव्हाळ, अर्चना खोत, राहील घलट्टे, योगेश पाटील, प्रतीक पेडणेकर, रवींद्र ढोले, दत्तात्रेय खुळपे, महेश वाडकर, रेखा बोर्जी, भारत चव्हाण, सागर राऊत उपस्थित होते.

यावेळी दहावीमधील विद्यार्थ्यांनी आपले अनुभव कथन करताना सांगितले की शिक्षकांनी आमच्यासाठी खूप मेहनत घेतली आहे. त्यामुळे आमची सुधा जबाबदारी बनत आहे की शाळेचा निकाल शंभर टक्के लागण्यासाठी आम्ही खूप परिश्रम घेणार असल्याचे सांगितले. पर्यवेक्षक श्रीधर ओव्हाळ यांनी यावेळी मार्गदर्शन केले. चेअरमन घलटे यांनी कॉपी न करण्याचे सांगून शाळेचे नाव बदनाम होईल असे कोणतेही कृत्य करू नका, असे आवाहन केले.



# गड-किल्ले भित्तीपत्र स्पर्धेत तुकाराम बांगारे प्रथम

## पालीवाला महाविद्यालयात वेगळा उपक्रम; विजेत्यांचा गौरव



**पाली : प्रतिनिधी**

शेठ ज. नौ. पालीवाला महाविद्यालयात छ. शिवाजी महाराज यांची ३९३वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शेठ ज. नौ. पालीवाला महाविद्यालयात गड किल्ल्याच्या भित्तीपत्र स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुधाकर लहू पंचांग व यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात तुळजापूर येथील इतिहास विभाग प्रमुख आणि अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेचे माजी अध्यक्ष प्रा. डॉ. सतीश कदम यांच्या उपस्थितीत वैचारिक कार्यक्रम पार पडले. शिवजयंती निमित्त विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या महाराष्ट्रातील गड किल्ल्याच्या भित्ती पत्राचे उदघाटन करण्यात आले.

यावेळी सु ए सो सचिव रवींद्र घोसाळकर व अन्य मान्यवर उपस्थित होते. यावेळी गड किल्ल्याच्या भित्ती पत्रकाचे परीक्षण करून प्रथम क्रमांक तुकाराम बांगारे, द्वितीय क्रमांक वेदांती वाघमारे, तृतीय क्रमांक जान्हवी बुरुमकर आदी विजेत्यांना पारितोषिक सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी व्याख्याते प्रा.डॉ सतीश कदम यांनी छ शिवाजी महाराजांप्रमाणे चैतन्यमय जीवन जगण्याचे आवाहन केले.

उपप्राचार्य तथा वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. एम.एस. लिमन यांनी अध्यक्षीय भाषण केले. 'या कार्यक्रमाचे प्रास्ताविक इतिहास विभाग प्रमुख प्रा.डी. एस. व्ही पाथरकर यांनी केले तर प्रा. डॉ. ए.एम. सोहनी यांनी सूत्रसंचालन केले. तर एम.ए (इतिहास) वर्गात शिकत असलेल्या अमित नरेश शिंदे या विद्यार्थ्याने सर्वांचे आभार मानले. या कार्यक्रमास नॅक कोऑर्डिनेटर प्रा. डॉ. एम. ए. बडगुजर, भूगोल, विभाग प्रमुख प्रा डॉ. एस. एस. पाटील, प्रा. एन. एन. पाटील , एन. एस. एस. विभाग प्रमुख प्राध्यापिका सौ. एस. एस बेलवलकर, प्रा. राकेश शिर्के,आदि उपस्थित होते. प्रा. संतोष भोईर, प्राध्यापिका सरिता देशमुख, प्राध्यापिका दिपाली बांगारे, शिकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



# हातनोली येथे जलजीवन पाणीपुरवठा योजनेचा शुभारंभ

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

जलजीवन मिशन अंतर्गत पिण्याच्या पाण्याची टाकी बांधण्याचा व हातनोली गावातून अंतर्गत पिण्याच्या पाण्याची पाइपलाइन टाकण्याच्या कामाचा भुमिपूजन कार्यक्रम सरपंच रितू ठोंबरे, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष सुधीरशेठ ठोंबरे व जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे यांच्या हस्ते झाला.

हातनोलीची लोकसंख्या २६०० ते २७०० आहे. या परिसरातील पाणी समस्या सुटावी यासाठी जिल्हा उपाध्यक्ष सुधीरशेठ ठोंबरे आणि जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे बंधूनी प्रयत्नशील राहून हातनोलीकरांसाठी मोठे योगदान दिले आहे. यावेळी तंटामुक्ती अध्यक्ष मनोहर देशमुख, सदस्या स्वाती देशमुख, शरद पिंगळे, प्रदिप गोंधळी, वसंत नलावडे, संतोष देशमुख, कुमार ठोंबरे, जयसिंग देशमुख, विनोद ठोंबरे उपस्थित होते.

# चौलमधील आरोग्य तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद



**रेवदंडा : प्रतिनिधी**

डॉ. आयेशा असीफ किरकीरे यांच्या अल-सेहा क्लिनिक चौलच्या वर्षपूर्तिनिमित्त शनिवारी मोफत आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते.

या शिबीरामध्ये रक्तातील शुगर तपासणी, रक्तदाब, ऑक्सिजन व पल्स रेट तसेच रुग्णांना मोफत वैद्यकीय सल्ला देण्यात आला. चौल परिसरातील अनेक नागरिकांनी याचा लाभ घेतला. चौलमधील सामाजिक कार्यकर्ते, हेमंत पाटील यांनी मोफत आरोग्य शिबीर आयोजन केल्याबद्दल डॉक्टरांचे आभार मानले. तज्ञ डॉक्टरांनी गरीब नागरिकांसाठी वेळोवेळी आरोग्य मार्गदर्शन शिबीर आयोजित केल्यास त्याचा चांगला फायदा नागरिकांना होईल व त्यांना आपल्या प्रकृतीची काळजी घेता येईल असे सांगितले.

आजच्या धकाधकीच्या जीवनात नियमित व्यायाम, योग्य आहार, पुरेशी झोप व व्यसनावर नियंत्रण ठेवल्यास आजारांवर मात करता येईल असे डॉ. आयेशा यांनी नागरिकांना सल्ला देताना सांगितले. गावातील लोकांचे आशिर्वाद हेच माझे डॉक्टर होण्याचे समाधान आहे.

# रेशनिंग दुकानदाराविरोधात पाचाडमध्ये उपोषण सुरूच



**महाड : प्रतिनिधी**

ऐतिहासिक किल्ले रायगडाच्या पायथ्याशी असलेल्या पाचाड गावामध्ये रेशनिंग दुकानदाराकडून रेशन धारकांना कमी प्रमाणात धान्य देत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी ग्रामस्थांच्या वतीने शाश्वत धेंडे यांनी सुरू केलेले आमरण उपोषण दुसऱ्या दिवशी देखील सुरूच राहिले आहे.

पाचडमध्ये सुमारे ३८० रेशन कार्डधारक आहेत. या ठिकाणी रेशनिंग दुकान चालवत असलेल्या दुकानदाराकडून आलेल्या रेशन कार्ड धारकांना व मानस्पद वागणूक देणे तसेच शासनाने निर्धारित केलेल्या प्रमाणापेक्षा कमी प्रमाणात धान्य दिले जात असल्याचा आरोप करत शाश्वत धेंडे यांनी दोन महिन्यापूर्वी महाड तहसीलदारांकडे तक्रार दाखल केली होती मात्र या तक्रारीची दखल न घेतल्याने शाश्वत झेंडे आणि ग्रामस्थांनी पाचाड येथे आमरण उपोषण सुरू केले आहे या उपोषणाचा हा तिसरा दिवस असून जोपर्यंत रेशन दुकानदाराचा परवाना रद्द होत नाही तोपर्यंत आपण माघार घेणार नाही असा पवित्रा ग्रामस्थांच्या वतीने शाश्वत धेंडे यांनी घेतला आहे.

पाचाड येथे परवानाधारक रेशनिंग दुकानदार याने आपले दुकान अन्य व्यक्ती चालवण्यात दिले होते मात्र या दुकानदाराकडून दुकानात आलेल्या रेशनिंग धारकांना अपमानास्पद वागणूक देणे तसेच कमी प्रमाणात धान्य दिले जात असल्याची तक्रार करण्यात आली होती शासनाने निर्धारित केलेल्या प्रमाणापेक्षा कमी प्रमाणात धान्य दिले जात असल्याचे ऑनलाईन पावतीनुसार उघड झाले आहे पाचवड मधील अनेक लोकांच्या ऑनलाईन पावत्या आणि दिले जात असलेले धान्य यामध्ये तफावत असल्याचे शाश्वत दंडे यांनी प्रशासनासमोर उघड केले मात्र तरी देखील कोणत्याच प्रकारची कारवाई होत नसल्याने अखेर शाश्वत दिंडे यांनी उपोषणाचा मार्ग स्वीकारला त्यानुसार दिनांक २२ फेब्रुवारीपासून हे उपोषणा आंदोलन सुरू झाले आहे महाड नाय तहसीलदार प्रदीप कुडाळ यांनी उपोषणकर्त्यांची भेट घेऊन संबंधित दुकानदारावर योग्य ते कारवाई केली जाईल अशा प्रकारचे आश्वासन दिले तसेच तहसीलदार कार्यालयाकडून अशा प्रकारचे पत्र जिल्हाधिकारी कार्यालयाला गेल्याचे सांगितले व पत्राची प्रत देखील देंडे यांना दिली मात्र परवाना रद्द झाल्याचे लेखी पत्र जोपर्यंत आपल्याला मिळत नाही तोपर्यंत हे उपोषण असेच पद्धतीने सुरू राहील असे जाहीर केले यावेळी पाचट ग्रामस्थ व माजी सरपंच देविदास गायकवाड यांनी देखील रेशन दुकानदाराच्या विरोधामध्ये संताप व्यक्त केला गेली पाच वर्ष या दुकानदाराकडून गोरगरीब जनतेचे धान्य लुबाडले गेले आहे ते धान्य शासनाने वसूल करावे व रेशनिंग दुकानदारांना भरपाई देण्यात यावी अशा प्रकारची मागणी केली तर रघुवीर देशमुख यांनी देखील या प्रकरणाबाबत नाराजी व्यक्त करत प्रशासनाने योग्य ते कारवाई करून गोरगरीब जनतेला न्याय द्यावा असे सांगितले.

# ऑस्ट्रेलियाला आणखी एक धक्का

## कर्णधार पॅट कमिन्स तिसऱ्या कसोटीतून बाहेर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**


भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील चार सामन्यांच्या कसोटी मालिकेतील तिसरा सामना १ मार्चपासून इंदूरच्या होळकर स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. या कसोटी सामन्यापूर्वी ऑस्ट्रेलियन संघाला मोठा झटका बसला आहे. कर्णधार पॅट कमिन्स या सामन्यातून बाहेर आहे. कौटुंबिक अडचणींमुळे तो काही दिवसांपूर्वी घरी परतला होता. त्याचवेळी त्याच्या अनुपस्थितीत संघाचा अनुभवी खेळाडू स्टीव्ह स्मिथकडे कर्णधारपद सोपविण्यात आले आहे.



इंदूरमध्ये खेळल्या जाणाऱ्या तिसऱ्या कसोटी सामन्यापूर्वी संघातून वगळल्यानंतर पॅट कमिन्सने आपले वक्तव्य प्रसिद्ध केले आहे. मी भारतात न जाण्याचा निर्णय घेतल्याचे कमिन्सने म्हटले आहे. या वेळी माझ्या कुटुंबासोबत असणे माझ्यासाठी महत्त्वाचे आहे. क्रिकेट ऑस्ट्रेलिया आणि त्याच्या सहकाऱ्यांनी दिलेल्या अद्भूत पाठिंब्याबद्दल सर्वांचे आभार!

भारत आणि ऑस्ट्रेलिया संघात चार सामन्यांची कसोटी मालिका खेळली जात असून या मालिकेतील पहिले दोन सामनेही भारताने जिंकले आहेत. त्यामुळे भारतीय संघाने चार सामन्यांच्या मालिकेत २-०ने आघाडी घेतली आहे. या मालिकेतील तिसरा सामना इंदूर आणि चौथा सामना अहमदाबादमध्ये खेळला जाणार आहे.

### स्मिथ करणार नेतृत्व



कमिन्सच्या अनुपस्थितीत स्टीव्ह स्मिथ संघाचे नेतृत्व करणार आहे. तोदेखील दिल्ली कसोटीनंतर पत्नीसोबत दुबईला गेला होता. त्याला या निर्णयाची माहिती देण्यात आली असून तो आता भारतात परतत आहे. स्मिथ हा अनुभवी खेळाडू असून त्याच्या नेतृत्वाखाली संघाने अनेक मोठे सामने जिंकले आहेत.

ऑस्ट्रेलियाचा संघ : स्टीव्ह स्मिथ (कर्णधार), अॅश्टन अगर, स्कॉट बोलँड, अॅलेक्स कॅरी (यष्टीरक्षक), कॅमेरॉन ग्रीन, पीटर हँड्सकॉम्ब, जोश हेझलवूड, ट्रॅव्हिस हेड, उस्मान ख्वाजा, मार्नस लॅबुशेन, नॅथन लियॉन, लान्स मॉरिस, टॉड मर्फी, मॅथ्यू रेनशॉ, मिचेल स्टार्क मिशेल स्वेपसन, डेव्हिड वॉर्नर.

भारतीय संघ : रोहित शर्मा (कर्णधार), केएल राहुल, शुबमन गिल, चेतेश्वर पुजारा, विराट कोहली, केएस भरत (यष्टीरक्षक), इशान किशन (यष्टीरक्षक), रविचंद्रन अश्विन, अक्षर पटेल, कुलदीप यादव, रवींद्र जडेजा, मोहम्मद शमी, मोहम्मद सिराज, श्रेयस अय्यर, सूर्यकुमार यादव, उमेश यादव, जयदेव उनाडकट.



# मोहा कोळीवाडा चषक क्रिकेट स्पर्धा

## भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

साईनाथ क्रिकेट क्लब आणि यंग स्टार यांच्या वतीने मोहा कोळीवाडा चषक २०२३ क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन शुक्रवारी (दि. २४) भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले.

उद्घाटन समारंभास वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, माजी सरपंच नर्मदा विठ्ठलशेठ ओवळेकर, तरघर सरपंच सविता मच्छींद्र कोळी, उत्तम कोळी, उलवे नोड अध्यक्ष निलेश खारकर, मदन पाटील, दीपक गोंधळी, प्रवीण ठाकूर, वहाळचे सदस्य वितेश म्हात्रे, प्रणय कोळी, नंदकुमार ठाकूर, प्रवीण ठाकूर, महादेव कोळी, चंद्रकांत कोळी, विक्रम कोळी, बाळाराम कोळी, लक्ष्मणबुवा कोळी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, क्रिकेटप्रेमी व खेळाडू उपस्थित होते. स्पर्धा २६ फेब्रुवारीपर्यंत रंगणार असून विजेते संघ व गुणवंत खेळाडूंना बक्षीस देऊन गौरविण्यात येणार आहे.

# अपंगत्वावर मात करून क्रिकेटमध्ये गरुडझेप

## खालापुरातील अभिजित मुंढेची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड




**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील ग्रामीण वणी गावातील भीमसेन (अभिजित) खंडू मुंढे या तरुणाला अपघाती अपंगत्व आले असता त्याला आपल्या हाताची काही बोटे गमवावी लागली होती, परंतु आपल्याला शारीरिक क्षमता कमी झाल्याची जाणीव न होऊ देता अभिजितने जिद्द व चिकाटीच्या जोरावर क्रिकेट खेळात उल्लेखनीय कामगिरी करीत राज्यस्तरीय क्रिकेट संघात आपले स्थान निश्चित केले. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्याचे कौतुक होत आहे.

अभिजित मुंढे हा उत्कृष्ट क्रिकेटपटू असून भेदक गोलंदाज म्हणून ओळखला जातो. त्याच्यातील कौशल्य लक्षात घेऊन राज्यस्तरीय अपंग क्रिकेट समितीने १ मार्च रोजी राजस्थानमध्ये होणाऱ्या क्रिकेट मालिकेसाठी त्याची निवड केली आहे. याबद्दल अनेकांनी अभिजितला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# इंग्लंडच्या हॅरी ब्रूकने मोडला विनोद कांबळीचा विश्वविक्रम



**वेलिंग्टन : वृत्तसंस्था**

इंग्लंडच्या फलंदाजांनी दुसऱ्या कसोटीतही न्यूझीलंडच्या गोलंदाजांची धुलाई केली. इंग्लंडने पहिल्या दिवशी ६५ षटकांत तीन बाद ३१५ धावा चोपल्या. झॅक क्रॅवली व बेन डकेट हे सलामीवीर अपयशी ठरल्यानंतर हॅरी ब्रूक व जो रूट यांनी शतकी खेळी केली.

झॅक (२), डकेट (९) आणि ऑली पोप (१०) माघारी परतल्याने इंग्लंडची अवस्था तीन बाद २१ अशी झाली होती. त्यानंतर जो रूट व ब्रूकने २९८ धावांची भागीदारी केली. रूटने १८२ चेंडूंत सात चौकार मारून १०१ धावा केल्या, तर ब्रूकने १६९ चेंडूंत २४ चौकार व पाच षटकार खेचून नाबाद १८४ धावा कुटल्या. ब्रूकने सहाव्या कसोटी सामन्यात चौथे शतक झळकावले. त्याच्या या शतकी खेळीने भारताचा माजी फलंदाज विनोद कांबळीच्या नावावर असलेला विक्रम मोडला गेला. कसोटी क्रिकेटमध्ये पहिल्या नऊ डावांत ८००+ धावा करणारा ब्रूक पहिला खेळाडू ठरला. त्याने कांबळीच्या नावावरील ७९८ धावांचा विक्रम मोडला.

# पराभवानंतर कर्णधार हरमनप्रीत भावूक

**केपटाऊन : वृत्तसंस्था**

महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य फेरीत भारतीय संघाचा ऑस्ट्रेलियाविरुद्ध पाच धावांनी पराभव झाला. पराभवानंतर भारताची कर्णधार हरमनप्रीत कौरही भावूक झाली.

सामना हरल्यानंतर हरमनप्रीत चष्मा घालून मॅचनंतरच्या प्रेझेंटेशनमध्ये पोहचली. जेव्हा प्रेझेंटर तिच्याशी बोलत होती, तेव्हा भारतीय कर्णधाराने सांगितले की, तिला आपल्या देशाने रडताना पाहावे असे वाटत नाही. म्हणूनच ती चष्मा घालून येथे आली आहे. मी वचन देते की आम्ही आमचा खेळ सुधारू आणि देशाला पुन्हा असे निराश होऊ देणार नाही.




सामन्याबद्दल बोलताना हरमन म्हणाली, जेव्हा मी आणि जेमी (जेमिमा रॉड्रिग्स) फलंदाजी करीत होतो आणि नंतर पराभूत झालो त्यापेक्षा दुर्दैवी असू शकत नाही. आज आम्हाला याची अपेक्षा नव्हती. मी ज्या प्रकारे धावबाद झाले त्यापेक्षा दुर्दैवी गोष्ट असूच शकत नाही. प्रयत्न करणे जास्त महत्त्वाचे होते. आम्ही शेवटच्या चेंडूपर्यंत लढण्याची चर्चा केली. निकाल आमच्या बाजूने लागला नाही, पण आम्ही या स्पर्धेत ज्या प्रकारे खेळलो त्यामुळे मी खूश आहे.

पराभवाबद्दल बोलताना कौरने पुढे सांगितले की, आम्ही लवकर विकेट गमावल्या तरीही आमच्याकडे चांगली फलंदाजी आहे हे आम्हाला माहित आहे. जेमीने आज ज्या प्रकारे फलंदाजी केली त्याचे श्रेय तिला द्यावे लागेल. आम्ही शोधत असलेली गती तिने आम्हाला दिली. अशी कामगिरी पाहून आनंद होतो. तिचा नैसर्गिक खेळ खेळताना पाहून आनंद झाला. आम्ही आमच्या ताकदीनुसार खेळलो नसलो तरीही आम्ही उपांत्य फेरी गाठली. आम्ही सोपे झेल सोडले. तुम्हाला जिंकायचे असेल तेव्हा त्यांना पकडावे लागेल. आम्ही खराब क्षेत्ररक्षण केले. आपण या गोष्टींमधून फक्त शिकू शकतो आणि चुका पुन्हा करू शकत नाही.

या सामन्यात ऑस्ट्रेलिया संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला होता. ऑस्ट्रेलियाने २० षटकांत ४ बाद १७२ धावा केल्या. प्रत्युत्तरात भारतीय संघाला ६ बाद १६७ धावाच करता आल्या. त्यामुळे पुन्हा एकदा विश्वचषक जिंकण्याचे स्वप्न भंगले.

# धोनी आणि हरमनप्रीतच्या खेळीत अनेक योगायोग





**मुंबई : प्रतिनिधी**

महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारताविरुद्धचा उपांत्य सामना ऑस्ट्रेलिया संघाने जिंकला. या सामन्यात भारतीय चाहत्यांना पुरुषांच्या वनडे वर्ल्डकप २०१९मधील महेंद्रसिंह धोनीच्या धावबादची आठवण झाली, कारण भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौरदेखील तशीच धावबाद झाली.

७ नंबरची जर्सी घातलेला एमएस धोनी काही इंचांनी मागे राहिल्याने बाद झाला होता. त्याचप्रमाणे याच नंबरची जर्सी परिधान केलेली भारतीय महिला संघाची कर्णधार हरमनप्रीत कौरसोबतही असेच घडले. योगायोगाने हीदेखील उपांत्य फेरी होती. दोन्ही कर्णधारांनीही अर्धशतक पूर्ण केले होते आणि काही इंचांच्या फरकाने ते धावबाद झाले. फरक फक्त एवढाच की, धोनी डायरेक्ट हिटवर धावबाद झाला, तर हरमनप्रीतसाठी यष्टिरक्षकाला स्टंप उडवावे लागले.

विशेष म्हणजे, पुरुष एकदिवसीय विश्वचषक २०१९च्या उपांत्य फेरीत माजी कर्णधार धोनी न्यूझीलंडविरुद्ध क्रीजवर उपस्थित होता आणि त्या वेळी संघाला विजयासाठी ११ चेंडूंत ३३ धावांची गरज होती. तेच महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेतही पाहायला मिळाले. जोपर्यंत कर्णधार हरमनप्रीत क्रीजवर होती तोपर्यंत टीम इंडियाचा विजय दिसत होता. संघाला विजयासाठी ३६ चेंडूत ४५ धावांची गरज होती. त्यानंतर हरमनप्रीतही धावबाद झाली आणि सामना भारताकडून निसटला.

# रसायनीत अॅथलेटिक्स, व्हॉलीबॉल प्रशिक्षण आणि निवड चाचणी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

स्पोर्ट्स ऑथॉरिटी ऑफ इंडिया आणि स्मॉल खेलो इंडिया सेंटर संलग्नित क्रीडा केंद्रातर्फे अॅथलेटिक्स आणि व्हॉलीबॉल या खेळाचे प्रशिक्षण रसायनी येथील महात्मा एज्युकेशन संस्थेचे पिल्ले एचओसी इंटरनॅशनल स्कूल येथे दिले जाणार आहे. या अंतर्गत निवड चाचणी ३ व ४ मार्च रोजी स्कूलच्या मैदानावर आयोजित करण्यात आली आहे.



वयोगट १२ ते १६ ज्या मुला-मुलींना या खेळामध्ये जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावर प्रमाणपत्र मिळालेले आहे त्यांनी सकाळी ८.३० वाजता आपल्या मूळ खेळाचे प्रमाणपत्र, जन्मतारखेचा दाखला, रहिवासी दाखला, आधार कार्ड आणि यांचे दोन झेरॉक्स सेट तसेच पासपोर्ट साईज पाच फोटो घेऊन एचओसी स्कूलच्या मैदानावर उपस्थित रहावे.

निवड झालेल्या खेळाडूंना महात्मा एज्युकेशन संस्थेकडून मोफत शिक्षण व निवासाची व्यवस्था करण्यात येईल तसेच मोफत प्रशिक्षण, क्रीडा स्पर्धा भत्ता खेळाचे साहित्य हे स्पोर्टस ऑथॉरिटी ऑफ इंडियाकडून मिळेल. या संधीचा इच्छुक खेळाडूंनी लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी व्हॉलीबॉल प्रशिक्षक आशिष धायडे (९१४६२९८८०४), मनोज सिग्गु (८३६९४५२९५०), अॅथलेटिक्स प्रशिक्षक इंजमाम उल हक (८८९८७८२९७१) यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन रसायनी पिल्लई कॅम्पसच्या वतीने करण्यात आले आहे.








दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**


हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com